


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २२१ * नांदेड * गुरूवार, दि. २० ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# आम्हाला मिळत नसेल तर 'शिवसेना पक्ष आणि चिन्ह' गोठवा

## ठाकरेंचे वकील कपिल सिब्बलांची न्यायालयात महत्त्वाची मागणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशाचं लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. ठाकरेंच्या शिवसेना पक्षाच्यावतीने वकील कपिल सिब्बल प्रभावी बाजू मांडत आहेत. आत्तापर्यंत शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे उद्धव ठाकरेंनाच दिले पाहिजे, अशी मागणी सिब्बल न्यायालयात करत होते. मात्र, पहिल्यांदाच कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे, राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या असून न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



कपिल सिब्बल यांनी यापूर्वीही आपले मुद्दे प्रभावीपणे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर मांडले असून विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळा असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला होता. त्यामुळे, शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्यालाच मिळेल, असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. तर, एकतर शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्याला मिळेल किंवा ते गोठवलं जाईल, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. आता, ठाकरेंचे वकिल कपिल सिब्बल यांनी मोठी मागणी करत चिन्ह आणि पक्षाचे नाव गोठवण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे.

माझा विचारपूर्वक मांडलेला युक्तिवाद असा आहे आणि मी माननीय न्यायालयाला विनंती करतो की, 'शिवसेना' हे नाव ठाकरे यांचेच आहे आणि शिंदे गटाला ते चिन्ह मिळू शकत नाही, असा निर्णय द्यावा. त्यांनी त्या चिन्हाचा लाभ घेतला आहे, याचा अर्थ त्यांच्या बाजूने कोणताही न्याय्य हक्क निर्माण होत नाही. हा चिन्हाचा अनधिकृत वापर करण्याचा प्रकार आहे. जर ते चिन्ह त्यांना मिळू शकत नसेल आणि मलाही मिळू शकत नसेल, तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे. कारण, ते नाव माझा हक्क आहे, अशा शब्दात कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत पहिल्यांदाच मोठी मागणी केली आहे.

# कोलकात्यात बहुमजली हॉटेलला भीषण आग; ९ बांगलादेशी पर्यटकांचा दुर्दैवी अंत, ६ गंभीर जखमी

**कोलकाता (प्रतिनिधी)–** कोलकात्यातून एक अत्यंत दुर्दैवी आणि हादरवणारी घटना समोर आली आहे. बुधवारी पहाटेच्या सुमारास येथील एका गजबजलेल्या परिसरातील हॉटेलला अचानक भीषण आग लागली. या दुर्घटनेत एका लहान मुलासह ९ बांगलादेशी नागरिकांचा मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत.

अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत पावलेले सर्व नागरिक हे बांगलादेशातून भारतात वैद्यकीय उपचारासाठी आले होते. यामध्ये ६ पुरुष, २ महिला आणि एका चिमुकल्याचा समावेश आहे. उपचार घेऊन परतण्यापूर्वीच त्यांच्यावर हा काळाने घाला घातला.

पहाटे २ वाजताच्या सुमारास हॉटेलमध्ये अचानक आग पसरली. काही वेळातच संपूर्ण इमारतीत धुराचे प्रचंड लोट पसरले, ज्यामुळे अनेक नागरिक आतच अडकले आणि गुदमरून बेशुद्ध पडले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव पथकाने कौशल्याने तत्परता दाखवत सुमारे ६० हून अधिक लोकांना सुखरूप बाहेर काढले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# उपोषण अंतरवालीतच, पण मुंबईलाही जाणार; मनोज जरांगे पाटल यांचा सरकारला इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन आक्रमक झाले आहेत. येत्या २९ ऑगस्टपासून ते पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, ते उपोषण अंतरवाली सराटीत करणार की मंबईत करणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. मात्र, अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिली आहे. पण प्रश्न जर निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला निघणार असल्याचा थेट इशारा देखील त्यांनी दिला आहे.

दरम्यान, यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांच्यामुळंच उपोषणाची वेळ आली असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. तर संजय सिरसाट यांचा आडमुठेपणा शिंदेंना नडणार असून दोघांची मिली भगत असल्याची शंका जरांगेंनी व्यक्त केली आहे. दरम्यान, उपोषण अंतरवाली सराटीत होणार असून, प्रश्न निकाली नाही लागला तर मुंबईत येणार असल्याचा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.



दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे उपोषण मुंबईत करणार की अंतरवाली सराटीत करणार असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अखेर मनोज जरांगे पाटील यांनीच उपोषण अंतरवाली सराटीत करणार असल्याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर सरकारला इशारा देखील दिला आहे. उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याची माहिती खुद्द जरांगे यांनी दिली आहे. येत्या २९ ऑगस्टला मनोज जरांगे पुन्हा आमरण उपोषणला बसणार आहेत. मात्र हे आंदोलन मुंबई होणार की अंतरवाली सराटी याबाबत संभ्रम होता. मात्र आता मराठा समाजाचं आंदोलन अंतरवाली सराटीतच होणार असून प्रश्न निकाली निघाला नाही तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला जाणार आहे. त्यासाठी परवानगी अर्ज केला असल्याचं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामुळेच उपोषणाची वेळ आली आहे. शिंदे यांच्या सांगण्यावरूनच बैठका घेण्यात आल्याचे जरांगे म्हणाले. एकनाथ शिंदे आणि संजय सिरसाट यांची मिलीभगत असून सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे.

# सणासुदीच्या काळात ग्राहकांना झटका! साखरेच्या दरात १८ दिवसांत १८ रुपयांची वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सध्या सणासुदीच्या काळाला सुरुवात झाली आहे. या काळातच ग्राहकांना मोठा झटका बसला आहे. कारण साखरेच्या दरात मोठी वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात मिठाईची खरेदी विक्री होत असते. मात्र, साखरेच्या वाढत्या दरामुळं मिठाईच्या किंमतीमध्ये देखील वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या १८ दिवसात साखरेच्या दरात तब्बल १८ रुपयांची वाढ झाली आहे.

मध्य प्रदेशात साखरेच्या दरात मोठी वाढ होत आहे. गेल्या अवघ्या १८ दिवसांत साखरेचा भाव जवळपास १८ रुपये प्रति किलोने वाढला आहे. भोपाळच्या घाऊक बाजारात आता साखरेचा भाव ६१ रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. व्यापाऱ्यांच्या मते, साखरेच्या दरात इतकी मोठी वाढ यापूर्वी कधीही झालेली नाही. दरम्यान, साखरेच्या दरात नेमकी एवढी वाढ का होत आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# रिक्षा चालकांवर आजपासून कडक कारवाई

## जागेवर बॅच-लायसन्स सस्पेंड करणार, प्रताप सरनाईकांची ठाम भूमिका

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालकाला मराठी येत नसल्यास आजपासून त्याचे थेट लायसन्स आता रद्द करण्यात येणार आहे. या शासन निर्णयासंदर्भात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठोस भूमिका घेत आता कारवाईचा इशारा दिला आहे.

याच मुद्यावर बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, मराठी न येणाऱ्या चालकाला सुरुवातीला एक महिन्याची नोटीस देऊन भाषा शिकण्याची संधी दिली जाईल. नोटीस देऊनही मराठी न शिकल्यास चालकाचे लायसन्स ३ महिन्यांसाठी निलंबित केले जाईल. तर त्यानंतरही नियमाचे पालन न केल्यास चालकाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

पुढे बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आता पर्यंत १ लाख ६५ हजार अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी मराठी शिकण्याचे प्रशिक्षण घेतले. १९८९ च्या नियमानुसार मराठी अनिवार्य आहे. मुंबई सर्वांना कुशीत घेवून पुढे जाते. आजपासून (२० ऑगस्ट) कारवाईला सुरूवात करू. रोजगार बुडावा ही आमची अपेक्षा नाही, परंतु मराठी अस्मिता टिकवणे गरजेचे आहे. काहींनी व्हिडिओ प्रकाशित करून मराठी बोलणार नसल्याची मग्रूरी केली, कायद्यानुसार आता त्यांच्यावर कारवाई करू. असेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

अशातच, मराठी शिकला नाहीत तर कारवाई अटळ आहे. व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे. व्हिडिओ रेकॉर्ड करून त्याला लायसन्स, बॅच दिली जाईल. लायसन्स देताना डोमेसाईल तपासावे लागेल. आरटीओचे वायुवेग पथक आहे. ज्यांच्याकडे मराठी प्रशिक्षणाचे सर्टिफिकेट नाही व मराठीही बोलता येणार नाही, त्यांच्यावर करवाई केली जाईल, असा ईशाराही मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

# केंद्र सरकार पुन्हा ई१० पेट्रोल आणण्याच्या तयारीत!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशभरात ई २० पेट्रोलचा (२० % इथेलॉल मिश्रित) वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र, जुन्या पेट्रोल कार आणि दुचाकींच्या मायलेजमध्ये घट झाल्याच्या तसेच इंजिन खराब होत असल्याच्या तक्रारींनंतर केंद्र सरकार आता मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. या समस्येवर उपाय म्हणून सरकार जुन्या वाहनांसाठी बाजारात पुन्हा ई १० पेट्रोल (१० टक्के इथेलॉल मिश्रित) उपलब्ध करून देण्याचा विचार करत आहे. देशाच्या मुख्य आर्थिक सल्लागारांनीही ई १० पेट्रोलचा पर्याय देण्याची शिफारस केल्याची माहिती समोर आली आहे.

भारतात सध्या कोट्यवधी जुन्या कार आणि बाईक्स रस्त्यावर धावत आहेत. या वाहनांचे उत्पादन झाले तेव्हा त्यांना ई १० पेट्रोल (१०% इथेनॉल) लक्षात ठेवून डिझाइन करण्यात आले होते. अनेक कंपन्यांच्या यूझर मॅन्युअलमध्ये (उदा. ह्युंदाईच्या जुन्या मॉडेल्समध्ये) १० टक्के पेक्षा जास्त इथेनॉल असलेले इंधन न वापरण्याची स्पष्ट सूचना देण्यात आली होती.

# सत्तेत योग्य वाटा मिळावा, आरपीआयची सरकारकडे मागणी

## महामंडळे, शासकीय समित्या आणि विधानपरिषदेत प्रतिनिधित्व देण्याची रामदास आठवलेंची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महायुती सरकारमध्ये सहभागी असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाला सत्तेतील सहभागाच्या प्रमाणात योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. महामंडळांपासून जिल्हास्तरीय समित्यांपर्यंत पक्षाच्या कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्याचा मुद्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडल्याचे त्यांनी नांदेड येथे पत्रकार परिषदेत सांगितले.



नामदार आठवले हे बुधवारी परभणी-नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता दुपारी चार वाजता नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात ते पत्रकारांशी बोलत होते. परभणी जिल्ह्यातील गौर येथील आरपीआय पक्षाचे तालुका अध्यक्ष सावळे यांचा खून झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतल्यानंतर ते नांदेड येथे पत्रकारांशी संवाद साधत होते.

आरपीआयला विधानपरिषदेचे एक सदस्यत्व तसेच दोन महामंडळांचे अध्यक्षपद मिळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विविध महामंडळांवर पक्षाच्या २० ते ४० कार्यकर्त्यांची नियुक्ती करावी. त्याचबरोबर पालकमंत्रीस्तरीय समित्या, जिल्हा समित्या आणि अन्य शासकीय संस्थांमध्येही आरपीआयला प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे आठवले म्हणाले.

सामाजिक न्यायाच्या योजनांना आर्थिक बळ देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. महात्मा फुले विकास महामंडळासाठी ३०० कोटी, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळासाठी १०० कोटी आणि रविदास विकास महामंडळासाठी ५० कोटी रुपयांची शासन हमी देण्याची मागणी करण्यात आली आहे. एकूण ४५० कोटींची शासन हमी उपलब्ध झाल्यास संबंधित महामंडळांना निधी मिळण्याचा मार्ग सुकर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला विजय सोनवणे, मिलिंद शिराढोणकर, गौतम काळे, संजय भालेराव, राहुल लांडगे, चंद्रकांत ठाणेकर, सुनील सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

# निवृत्त राज्यकर उपायुक्त एकनाथराव पावडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरालगतच्या पावडेवाडी येथील रहिवासी तथा महाराष्ट्र शासनाचे निवृत्त राज्यकर उपायुक्त एकनाथराव सोपानराव पावडे (वय ५९) यांचे बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने पावडेवाडी परिसरासह प्रशासकीय, सामाजिक व विविध क्षेत्रांत हळहळ व्यक्त होत आहे.




एकनाथराव पावडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या राज्यकर विभागात विविध ठिकाणी कर्तव्यनिष्ठेने सेवा बजावली. बार्शी, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, यवतमाळ आणि नांदेड आदी ठिकाणी त्यांनी जबाबदारीच्या पदांवर कार्यरत राहून आपल्या कार्यक्षमतेची व प्रामाणिक सेवेची छाप उमटविली. फेब्रुवारी २०२६ अखेर ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले होते.

शासकीय सेवेसोबतच त्यांना कृषी, सामाजिक कार्य आणि साहित्य क्षेत्राची विशेष आवड होती. आपल्या जन्मगावाच्या विकासाची तळमळ त्यांच्या मनात कायम होती. 'माझं गाव! माझं स्वप्न!' या संकल्पनेतून त्यांनी जन्मगावी विविध सामाजिक व विकासाभिमुख उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतला. गावाशी असलेली त्यांची नाळ आणि सामाजिक बांधिलकी त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येत होती.

मराठा सेवा संघाच्या सामाजिक चळवळीशीही ते निगडित होते. समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रशासकीय सेवेतील अनुभव, सामाजिक जाणिवा आणि गावाविषयीची आस्था यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येत होता.

एकनाथराव पावडे यांच्या अकस्मात निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी अधिकारी-कर्मचारी तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या सहकाऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता गुरुजी चौकाच्या अलीकडील रोडवरील माधवनगर येथील त्यांच्या राहत्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार असून, जवळच असलेल्या त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी सविताताई, एक मुलगा, एक मुलगी, जावई, नात तसेच मोठा आप्तपरिवार आहे.




# ६०० व्या कसोटीत टीम इंडियाचा दिमाखदार विजय; श्रीलंकेविरुद्ध १-० अशी आघाडी!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने श्रीलंका दौऱ्याची दणकेबाज सुरुवात करत गॉल येथील पहिल्या कसोटी सामन्यात १६५ धावांनी विजय नोंदवला. अंतिम दिवशी श्रीलंकेला विजयासाठी कठीण आव्हान मिळाले होते, परंतु भारतीय गोलंदाजांच्या शिस्तबद्ध आणि भेदक माऱ्यासमोर यजमान संघाचा दुसरा डाव २०६ धावांवर आटोपला. या विजयासह भारताने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली असून, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

श्रीलंकेविरुद्धच्या गॉल कसोटीतील विजयामुळे भारताच्या खात्यात १२ गुणांची भर पडली आहे. सामन्यापूर्वी भारताचे ५२ गुण होते. आता हे गुण ६४ झाले आहेत. तसेच भारताची विजयाची टक्केवारी म्हणजेच पीसीटी ४८.१५ टक्क्यांवरून ५३.३३ टक्क्यांवर पोहोचली आहे. मात्र या शानदार विजयानंतरही डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारताच्या स्थानात बदल झालेला नाही. टीम इंडिया पाचव्या स्थानावरच कायम आहे. भारताने पहिल्या डावात ४६२ धावा केल्या. या डावात देवदत्त पडिक्कलने शानदार फलंदाजी करत १६७ धावांची दमदार खेळी केली. त्याच्या संयमी आणि आक्रमक फलंदाजीमुळे भारताला मोठी धावसंख्या उभारता आली.

# डिव्हायडरमधील गॅप ठरताहेत मृत्यूचे सापळे

## राँगसाईड क्रॉसिंगमुळे अपघाताचा धोका; धोकादायक गॅप बंद करण्याची मागणी

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नांदेड-देगलूर महामार्गावरील डिव्हायडरमधील अनावश्यक गॅप वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहेत. पेट्रोल, डिझेल अथवा सीएनजी भरण्यासाठी काही वाहनचालक या गॅपमधून राँगसाईडने महामार्ग ओलांडत असल्याने भरधाव वाहनांसमोर अचानक धोका निर्माण होत आहे.

नरसी-नायगाव मार्गावरील पेट्रोल पंपांच्या परिसरात अशा गॅपचा शॉर्टकट म्हणून वापर होताना दिसून येतो. अधिकृत यू-टर्न घेण्याऐवजी वाहने थेट राँगसाईडने येत असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा धोका अधिक गंभीर बनतो.

१३ ऑगस्ट रोजी पेट्रोल पंपाजवळ राँगसाईडने आलेल्या ट्रकने ऑटोला धडक दिली. या भीषण अपघातात नरसी येथील इस्माईल शेख यांचा मृत्यू झाला, तर सात जण गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर डिव्हायडरमधील गॅपमधून होणाऱ्या राँगसाईड वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.




महामार्गावरील धोकादायक गॅपची पाहणी करून अनावश्यक गॅप तातडीने बंद करावेत. तसेच आवश्यक ठिकाणी सुरक्षित यू-टर्न, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर आणि प्रकाशव्यवस्था करावी, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे.

अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच धोका ओळखणे गरजेचे आहे. काही मिनिटांचा शॉर्टकट कोणाच्या जीवावर बेतू नये, यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# पाण्याच्या शुद्धतेचा प्रश्न नेहमीचाच

रेल्वे स्थानकांवरील पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये ई. कोलायसारख्या घातक जिवाणूंची उपस्थिती आढळल्याचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या अहवालातून समोर आलेले निष्कर्ष केवळ रेल्वे प्रशासनासाठी धोक्याची घंटा नाही, तर संपूर्ण सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी गंभीर इशारा आहे. प्रवाशांना मोफत अथवा सार्वजनिक नळांमधून मिळणारे पाणी सुरक्षित आहे की नाही, हा प्रश्नच निर्माण होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. २०२६ मध्ये देश आधुनिकतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे सांगितले जाते. वंदे भारतसारख्या आधुनिक गाड्या, रेल्वे स्थानकांचे पुनर्विकास प्रकल्प, मोठमोठ्या पायाभूत सुविधा आणि कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक यांचा गाजावाजा होत असताना, सामान्य नागरिकाला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळत नसेल तर या विकासाचे मूल्यमापन नेमके कशाच्या आधारावर करायचे, हा प्रश्न उपस्थित होतो. प्रस्तुत पाहणीत तपासलेल्या ५१२ रेल्वे स्थानकांपैकी तब्बल ४५८ स्थानकांवर मूलभूत प्रवासी सुविधा अपुऱ्या असल्याचे निदर्शनास आले आहे. ही संख्या जवळपास ८९ टक्के आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे आठ स्थानकांवरील वॉटर कुलरमधून घेतलेल्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये ई. कोलाय आढळल्याचे समोर आले आहे. ई. कोलायची उपस्थिती ही पाण्याच्या दूषिततेचे स्पष्ट संकेत देणारी बाब आहे. असे पाणी प्यायल्यास नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. मात्र या अहवालाकडे केवळ 'रेल्वे स्थानकांवरील दूषित पाणी' या मर्यादित चौकटीतून पाहणे योग्य ठरणार नाही. महाराष्ट्रातील सर्वच भागांमध्ये सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याची व्यापक तपासणी करण्याची आता नितांत गरज आहे. रेल्वे स्थानके, बसस्थानके, शासकीय रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, वसतिगृहे, सार्वजनिक नळ, पाणीपुरवठा केंद्रे, अंगणवाड्या तसेच विविध शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या पाण्याचे नमुने तपासले गेले पाहिजेत. विशेषतः ग्रामीण भागात परिस्थिती आणखी गंभीर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक गावांमध्ये विहिरी, बोअरवेल, जलकुंभ किंवा स्थानिक पाणीपुरवठा योजनांवर नागरिक अवलंबून असतात. पावसाळ्यात पाण्याचे स्रोत दूषित होण्याची शक्यता वाढते. सांडपाणी आणि पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्यांमध्ये गळती, जुन्या पाइपलाईन, अस्वच्छ जलसाठे आणि अपुरी निर्जंतुकीकरण व्यवस्था यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे राज्य सरकारने केवळ सर्वच ठिकाणांची राज्यव्यापी पाणी गुणवत्ता तपासणी मोहीम हाती घेतली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातून नमुने घेऊन त्यांची स्वतंत्र आणि वैज्ञानिक पद्धतीने तपासणी झाली पाहिजे. ई. कोलाय, इतर जिवाणू, रासायनिक घटक, जड धातू आणि आरोग्यास घातक ठरू शकणाऱ्या क्षार व अन्य घटकांची तपासणी नियमितपणे केली पाहिजे. यापुढे पाणी तपासणीचा अहवाल केवळ सरकारी फाइलमध्ये बंदिस्त राहता कामा नये. कोणत्या ठिकाणचे पाणी तपासले, त्याचा अहवाल काय आला आणि दूषित पाणी आढळल्यास कोणती कारवाई करण्यात आली, याची माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक केली पाहिजे. पाणीपुरवठा केंद्रांवर तपासणीची तारीख आणि अहवाल प्रदर्शित करण्याची सक्ती केली जाऊ शकते. दोष आढळल्यास संबंधित यंत्रणेवर वेळबद्ध कारवाईची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. स्वच्छता अभियान, जलजीवन मिशन आणि विविध पाणीपुरवठा योजनांचा खरा परिणाम घोषणांमध्ये नव्हे, तर नागरिकांच्या नळातून येणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेत दिसला पाहिजे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी ही कोणतीही ऐष-आरामाची सुविधा नाही; तो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत आरोग्याचा प्रश्न आहे. रेल्वेच्या या अहवालाने एक आरसा आपल्यासमोर धरला आहे. त्या आरशात केवळ रेल्वे स्थानकांचे चित्र दिसत नाही, तर आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील त्रुटीही दिसतात. त्यामुळे अहवालावर केवळ प्रतिक्रिया देण्यापेक्षा त्यातून धडा घेण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्थानकांपासून गावातील सार्वजनिक नळापर्यंत आणि महानगरातील जलकुंभापासून शाळेच्या पाण्याच्या टाकीपर्यंत, राज्यातील प्रत्येक सार्वजनिक पाणी स्रोत तपासला गेला पाहिजे. कारण विकासाच्या गाड्या कितीही वेगाने धावल्या, तरी त्या गाडीतील प्रवासी आणि समाजातील नागरिक सुरक्षित पाणी पिऊ शकत नसतील, तर विकासाच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह उभे राहते.

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २० ऑगस्ट. भारताचे माजी पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे राजीव गांधी यांची जयंती. आधुनिक विचार, विज्ञान-तंत्रज्ञानावरील विश्वास आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे राजीव गांधी यांनी भारताच्या विकासाला नवी दिशा दिली, म्हणूनच त्यांना भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे प्रमुख शिल्पकार मानले जाते.

२० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी त्यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असूनही राजीव गांधी यांना सुरुवातीला राजकारणात विशेष रस नव्हता. त्यांची खरी आवड विज्ञान, तंत्रज्ञान आणि विमानउड्डाणात होती. त्यांनी व्यावसायिक वैमानिक म्हणून इंडियन एअरलाइन्समध्ये काम केले.

भाऊ संजय गांधी यांच्या १९८० मधील निधनानंतर राजीव गांधी राजकारणात आले. अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवून विजय मिळवला. १९८२ मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाला अभूतपूर्व जनादेश मिळाला.

पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भारताला संगणक, दूरसंचार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाकडे नेण्याची त्यांची दूरदृष्टी. २१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक असेल या विचाराने त्यांनी देशात संगणकीकरण आणि दूरसंचाराच्या विस्ताराला चालना दिली. त्या काळात संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मोठा विरोध आणि संभ्रम असतानाही त्यांनी



भविष्यातील भारताची गरज ओळखली. सॅम पित्रोदा यांच्यासारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने दूरसंचार क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली.

राजीव गांधींच्या काळात शिक्षण क्षेत्रालाही नवी दिशा मिळाली. १९८६ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण, जवाहर नवोदय विद्यालयांची संकल्पना, उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर यामुळे शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडले.

पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी ६४ वे आणि ६५ वे घटनादुरुस्ती विधेयक त्यांच्या सरकारने मांडले. ही विधेयके त्या वेळी मंजूर झाली नाहीत; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक बळ देण्याचा पाया पुढे ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे मजबूत झाला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागासाठीही नवे दालन खुले झाले.

राजीव गांधींच्या कारकिर्दीत काही निर्णयांवर तीव्र मतभेदही झाले आणि त्यांच्या सरकारला अनेक राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना उपलब्धींसोबत मर्यादा आणि वादग्रस्त निर्णयांचाही वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूतील श्रीपेरुंबुदूर येथे लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम या श्रीलंकेतील दहशतवादी संघटनेशी संबंधित आत्मघाती हल्ल्यात राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यांच्या स्मरणार्थ २१ मे हा दिवस भारतात दहशतवादविरोधी दिवस म्हणून पाळला जातो.

राजीव गांधी यांनी भारताला तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची दिशा दाखवली. संगणक आणि दूरसंचार हे केवळ भविष्यातील साधन नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचे आधारस्तंभ ठरू शकतात, हे त्यांनी त्या काळात ओळखले. आज भारत माहिती-तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि दूरसंचार क्षेत्रात जगातील महत्त्वाच्या देशांमध्ये उभा आहे, त्यामागील पायाभरणीत राजीव गांधींच्या धोरणांचा निश्चितच मोठा वाटा आहे. आधुनिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या या दूरदृष्टीच्या पंतप्रधानाला त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे

# अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रणेते -डॉ. नरेंद्र दाभोळकर



डॉ. नरेंद्र अच्युतराव दाभोळकर हे एक मानवतावादी थोर विचारवंत होते. जात, धर्म, लिंग, वंश व जन्म स्थान बाजूला सारून सर्वांना समानतेने वागवावे,या विचाराचे ते पाईक होते.त्यांनी निसर्गावर व प्राणीमात्रां वर सुद्धा दया करावी. असे आदर्श विचारांनी ते भारलेले ज्ञानवंत व्यक्ती होते.आणि उत्तम कबड्डीपटू होते.त्यांना सामाजिक कार्याची मनापासून खूप आवड होती.त्यांनी जातीभेद सांप्रदायिक भेद, वंश भेद,वसाहतवाद, प्रांतवाद यांना कडाडून विरोध केला. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा, जादूटोणा, काळी जादू, भूत, पिशाच्च, अंगात येणे, बुवाबाजी, चमत्कार या सर्व अंधश्रद्धेवर त्यांनी कोरडे ओढले. वाईट कृत्यावर बंधन घालण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्य हाती घेतले. त्यांनी 'परिवर्तन' नावाची एक सामाजिक संस्थाही स्थापन केली. 'विवेक' नावाचे साप्ताहिक सुरू करून लोकांच्या मनात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

अशा या बुद्धिवादी, विवेकवादी, विज्ञानवादी विचारवंताचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी १ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मिरज येथील शासकीय महाविद्यालयात झाले, तिथेच त्यांना एमबीबीएस ची पदवी मिळाली. काही वर्षे डॉक्टर म्हणून त्यांनी जनसामान्यांची सेवा केली.आणि त्यांनी आपला मोर्चा सामाजिक क्षेत्राकडे वळवला. पिकामध्ये जास्त गवत झाल्यानंतर पिकांना ते वाढू देत नाही. तसे समाजामध्ये अंधश्रद्धा, रूढी परंपरा पसरल्या की समाज हा दुर्बल होतो. त्यामुळे समाजातील विवेकवादी विचार लोप पावत असतात. समाजातून प्रबोधनात्मक विचारांच्या विकासाची मशागत करावी लागते.त्यासाठी उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षणाची गरज असते. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही. म्हणून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी या समाज सुधारकांनी समाजासाठी केलेल्या कार्याची माहिती आपल्या समाज प्रबोधनातून करून देत असत. मनुष्याने व्यक्तीवर क्रोध करण्यापेक्षा करूणा भावनेने वागावे. उपहासाने न बोलता आपुलकीने विचार मांडावेत. ते लोकांच्या अंत:करणाला भिडतात. माणसाची जात त्याच्या जातीवरून न ठरवता विचारावरून ठरली पाहिजे. असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांचा आज तेरावा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा घेणार आहोत.

महाराष्ट्रात बुद्धीवादी विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी कधीही कोणाचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आध्यात्मिक नुकसान केले नाही. समाजाने विवेक बुद्धीने वागावं, अंधश्रद्धा बाळगू नयेत, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवावा, भूत,पिश्शाच,भानामती, जादूटोणा या गोष्टीकडे दुर्लक्ष करावं, असे स्पष्ट त्यांनी समाजाला सांगितले.तरी समाजांनी त्यांच्या या आधुनिक विचारांकडे दुर्लक्ष केले. आपण आधुनिक पुरोगामी महाराष्ट्र म्हणून स्वतःचा पार्श्वभाग बडवून घेतो. आणि इकडे नवस सायसा मध्ये गुंतून पडलो आहोत.

असा हा महाराष्ट्र कधी ही सुधारणार नाही.अनेक लोक आज अंधश्रद्धेचे बळी पडलेले आहेत. पैशाचा पाऊस पाडतो म्हणून अनेक बाबा,भगत, बुवा, महिलांची दिवसाढवळ्या आर्थिक लूट आणि त्यांच्या सोबत अनैतिक संबंध करीत आहेत. त्यांनी पुस्तके लिहून अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. आपलं सर्वस्व समाजासाठी अर्पण केले. ज्या माणसांची बौद्धिक क्षमता गुलामीत व नवस-सायसा मध्ये गुंतली आहे. तो स्वतःच्या बुद्धीने आपलं कार्य करत नाही. लहानपणीच मुलांना अंधश्रद्धेकडे घेऊन जाणाऱ्या भाकड कथा सांगितल्या जातात. सायंकाळ झाली. भूत येते.घरातील मोठ्या व्यक्तीं असे बोलून त्यांच्या मनावर अंधश्रद्धेचा पगडा लादतात. ग्रह-ताऱ्यांची भीती दाखवतात. मंगळ अमंगळ करतात. विवाह जुळवून देते वेळेस छत्तीस गुण कमी जास्त करून सांगतात. बिदागी मिळाली की लगेच योग्य कार्यक्रम करतात. हा भाग हात सफाई व कौशल्याचा एक भाग आहे . हे आपल्याला कधी कळणार.

देव कोणी पाहिला? तो कोठे असतो? तो काय करतो? हे संत गाडगे महाराजांनी समाजाला प्रश्न विचारून उत्तरे काढून घेतली. तरी समाज ऐकला नाही. तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धेवर ग्रामगीतेतून प्रभावी लेखन केले. अनेक मोठमोठ्या विचारवंतांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह धरला. तरी आज आपण कुठे नेऊन ठेवलाय आपला देश म्हणायची वेळ आली आहे. एका बाजूला विचारवंत आहेत. दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धाळू लोकांची संख्या भस्मासुरासारखी वाढली आहे. ज्यावेळी जनमत वाढते, तेव्हा शहाणपण चालत नाही.तेथे दिवसाढवळ्याअंधश्रद्धा वाढतातच ? साहित्यिक, लेखक, कवी आपल्या लेखांमधून समाजाचे प्रबोधन करतात. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. एवढं प्रबोधनात्मक लिहून सुद्धा समाज अधोगतीकडे जात आहे. बाबा, बुवा, भगत अशिक्षित समाजाला चमत्काराच्या नावाखाली लूबाडतात. प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्त्व सांगून क्षणाक्षणाला देणगी मागतात. लोकांना वेगवेगळ्या महिन्यातील, सण-वार, यांचं महत्त्व सांगून महिलांना पटवून सांगून पैशाची लूटमार करून घेतात आणि आरामात बसून स्वतःचा चरित्रार्थ चालवतात.

डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी लोक फसू नयेत,म्हणून अंधश्रद्धा पसरणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई करण्यासाठी पुढे आले. भूत दाखवणाऱ्या व्यक्तीला लाखो रुपयांचे त्यांनी बक्षीस ठेवले, परंतु त्यांना लोकांनी डोक्यावर घेतले नाही. ज्यांचा धंदा बुडायला लागला ते तर त्यांना पाण्यात पाहू लागले. जो व्यक्ती डॉक्टरची नोकरी सोडून अंधश्रद्धा दूर करण्या साठी दिवस रात्र एक करीत होते. तरी त्याचे नामोनिशान मिटवण्याचे काम या महाराष्ट्रातील अज्ञानी लोकांनी केले. त्यांच्याबरोबर आणखी बाकीच्या चार लोकांनाही यमसदनी पाठवले. आम्ही असेच अंधश्रद्धाळू राहणार? आम्ही असेच कोंबडे-बकरे कापणार? नवसायास करणार? तुमच्या बापाचे आम्ही खातो काय?आमच्या वाटेतून तुम्ही बाजूला व्हा... नाहीतर तुम्हाला गोळ्या घातल्या जातील अशा धमकीचे फोन त्यांना केले.

पुरोगामी महाराष्ट्रातील धर्मांध असणाऱ्या या हल्लेखोरांनी बुद्धिजीवी असलेल्या व्यक्तीचा प्राणच घेतला.पुरोगामी महाराष्ट्रानं काय साधले. अंधश्रद्धेच्या नावाखाली शेतकरी दुर्बल होत आहे. भक्तीच्या नावाखाली लोक दिवस रात्र फिरत आहेत. मोक्ष मिळतो. अधिक मास, श्रावण मास बारा वर्षानंतर येणारे मोठे मेळावे या सगळ्याचा अभ्यास केल्यास जसे कुत्र्याला गती,भावकीला प्रगती, अंधश्रद्धाळू लोकांना विचारवंताची विवेकवादी वाचा नको असते. यांनी जर लोकांना सर्व समजावून सांगितले तर आपले हे सगळे दुकान बंद होईल. या हेतूने अनेक जण एकत्रित येऊन पद्धतशीरपणे त्यांचा कायमचा काटा २०ऑगस्ट २०१३ रोजी पुणे येथे ओंकारेश्वर मंदिराजवळ सकाळी सात वाजून पंचवीस मिनिटांनी काढून टाकला. पुरोगामी महाराष्ट्रने काय साध्य केले.अनेक पुरावे गोळा करता करता बारा वर्षे संपून गेले. शेवटी दोन जणांना जन्मठेप आणि तीन जणांची निर्दोष सुटका करण्यात आली. समाजकंटक व हल्लेखोर तेवढ्यावर थांबले नाहीत.

कॉम्रेड गोविंद पानसरे यांचाही १५ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी कोल्हापूर मध्ये हत्या करण्यात आली. हे हत्या सत्र सुरूच राहिले. एम. एम. कलबुर्गी हे लेखक विचारवंत होते. त्यांनीही समाजातल्या अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. ते पेशाने कर्नाटक राज्यातील हम्पी येथील विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते. या बुद्धिजीवी व्यक्तीचा सुद्धा खून करण्यात आला. एवढ्यावर न थांबता भारतीय पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते गौरी लंकेश यांनीही दलित तसेच महिला यांच्यावर होणारे अन्यायाची त्यांच्या साप्ताहिकांमधून वाचा फोडली. तेव्हाही हल्लेखोराने ५ सप्टेंबर २०१७ रोजी त्यांची हत्या केली. असे जर आपल्या देशात घडत असेल, तर सत्य बोलावं की नाही? अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. गप्प बस्स नसता कान कापीन असे म्हटले जाते. तसेच आता होत आहे. यात थोडे सुद्धा चुकीचे नाही. आपण वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावे. म्हणून गाभाभूत घटकांमध्ये त्याची नोंद केली आहे. परंतु अलीकडे संस्कार गेले कुठे? शिक्षण शिकून मनुष्य विचारवंत होत असतो. तर सध्याला शिक्षण शिकवून दहशतवादी निर्माण होत आहेत. अशी म्हणण्याची लाजिरवाणी वेळ आपल्या देशावर आले आहे. असे जर विचारवंत शरीराने मारले गेले तरी त्यांचे विचार मरत नाहीत. त्यांच्या विचारांनी चालण्याची आज समाजाला गरज आहे. प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा. अंधश्रद्धेपासून दूर राहावे. तेव्हाच त्यांच्या मृत आत्म्याला शांती मिळेल.

**-प्रा. बरसमवाड विठ्ठल**
संस्थापक विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड*

# अक्षय ऊर्जा: निसर्गाची शक्ती, भविष्याची क्रांती!

दरवर्षी २० ऑगस्ट रोजी भारतात अक्षय ऊर्जा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत आणि इतर अक्षय ऊर्जास्रोतांविषयी जनजागृती करणे हा आहे.

आज जग एका मोठ्या ऊर्जासंकटासमोर उभे आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि ऊर्जेची वाढती गरज यामुळे कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूसारख्या पारंपरिक ऊर्जास्रोतांवर मोठा ताण पडत आहे. त्याचबरोबर वाढते प्रदूषण आणि हवामान बदल ही गंभीर आव्हाने बनली आहेत. अशा वेळी सूर्याची अमर्याद किरणे, वाऱ्याची वेगवान झुळूक आणि पाण्याची अथांग शक्ती आपल्याला स्वच्छ ऊर्जेचा नवा मार्ग दाखवतात.

निसर्गाची शक्ती, मानवाची बुद्धी आणि उज्ज्वल भविष्याची आशा यांचा सुंदर संगम म्हणजे अक्षय ऊर्जा!

अक्षय ऊर्जा ही केवळ विजेचा पर्याय नाही, तर स्वच्छ पर्यावरण, ऊर्जा स्वावलंबन आणि शाश्वत विकासाची गुरुकिल्ली आहे. म्हणूनच आजची गरज आहे ऊर्जा वाचवण्याची नव्हे, तर ऊर्जेचे भविष्य बदलण्याची!

अक्षय ऊर्जा म्हणजे निसर्गातून सतत उपलब्ध होणारी आणि नैसर्गिक प्रक्रियांद्वारे पुन्हा निर्माण होणारी ऊर्जा होय. सूर्य, वारा, पाणी, जैविक पदार्थ आणि पृथ्वीतील उष्णता हे तिचे प्रमुख स्रोत आहेत. सूर्यप्रकाशापासून सौर ऊर्जा, वाऱ्यापासून पवन ऊर्जा आणि पाण्यापासून जलविद्युत ऊर्जा निर्माण केली जाते. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांसारखे पारंपरिक ऊर्जास्रोत मर्यादित असून ते संपणारे आहेत; त्यामुळे भविष्यासाठी अक्षय ऊर्जा हा एक महत्त्वपूर्ण पर्याय आहे.

अक्षय ऊर्जा ही पर्यावरणपूरक आणि शाश्वत ऊर्जा आहे. तिच्या वापरामुळे प्रदूषण व हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यास मदत होते. तसेच जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन ऊर्जा स्वावलंबनाला चालना मिळते. वाढती ऊर्जेची गरज, हवामान बदल आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा विचार करता अक्षय ऊर्जेचा अधिकाधिक वापर करणे ही काळाची गरज आहे. निसर्गाची शक्ती योग्य प्रकारे वापरून आपण स्वच्छ, सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्य घडवू शकतो.

सूर्य हा पृथ्वीवरील ऊर्जेचा सर्वात मोठा आणि नैसर्गिक स्रोत आहे. सूर्याच्या प्रकाशापासून सौर पॅनेलच्या साहाय्याने वीज निर्माण केली जाते. सौर ऊर्जा ही स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि अक्षय ऊर्जा असल्यामुळे तिचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. घरांच्या छतांवर सौर पॅनेल बसवून घरगुती वापरासाठी वीज निर्माण करता येते आणि त्यामुळे पारंपरिक विजेवरील अवलंबित्व व वीजबिल



कमी करण्यास मदत होते.

सौर ऊर्जेचा उपयोग केवळ शहरांमध्येच नव्हे, तर ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्येही मोठ्या प्रमाणावर करता येतो. ज्या ठिकाणी पारंपरिक वीज पोहोचवणे कठीण आहे, तेथे सौर दिवे, सौर पंप आणि सौर पॅनेल उपयुक्त ठरतात. त्यामुळे शेती, शिक्षण, पाणीपुरवठा आणि दैनंदिन जीवनासाठी स्वच्छ ऊर्जा उपलब्ध होऊ शकते. सूर्याची अमर्याद शक्ती वापरून स्वच्छ आणि उज्ज्वल भविष्य घडवणे म्हणजेच सौर ऊर्जेचा योग्य उपयोग होय.

पवन ऊर्जा ही वाऱ्याच्या शक्तीपासून मिळणारी स्वच्छ आणि अक्षय ऊर्जा आहे. पवनचक्क्यांच्या पात्यांना वाऱ्यामुळे गती मिळते आणि त्या गतीचा उपयोग जनरेटरद्वारे वीज निर्माण करण्यासाठी केला जातो. भारतात तसेच महाराष्ट्रातील काही भागांत पवन ऊर्जेची मोठी क्षमता आहे. या ऊर्जेसाठी कोळसा किंवा पेट्रोलियमसारखे इंधन जाळण्याची गरज नसल्यामुळे प्रदूषण कमी करण्यास मदत होते. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी पवन ऊर्जा हा महत्त्वाचा पर्याय आहे. नद्या, धरणे आणि वाहत्या पाण्याच्या शक्तीचा उपयोग करून निर्माण केली जाणारी ऊर्जा म्हणजे जलविद्युत ऊर्जा. पाण्याच्या प्रवाहामुळे टर्बाइन फिरतात आणि त्यातून वीज निर्माण होते. मोठ्या प्रमाणावर वीज निर्मितीसाठी जलविद्युत प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र मोठी धरणे उभारताना जंगल, जैवविविधता आणि स्थानिक लोकांचे जीवन यांवर होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांचाही काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

वनस्पती, शेतीतील अवशेष, सेंद्रिय कचरा, शेण आणि इतर जैविक पदार्थांपासून मिळणाऱ्या ऊर्जेला जैव ऊर्जा म्हणतात. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून बायोगॅस, उष्णता किंवा वीज निर्माण करता येते. विशेषतः ग्रामीण भागात शेती आणि पशुपालनातून निर्माण होणाऱ्या अवशेषांचा उपयोग ऊर्जानिर्मितीसाठी करता येतो. त्यामुळे कचऱ्याचे व्यवस्थापन, ऊर्जा निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या तिन्ही क्षेत्रांना फायदा होऊ शकतो. पृथ्वीच्या आतील भागात साठलेल्या उष्णतेपासून मिळणाऱ्या ऊर्जेला भू-औष्णिक ऊर्जा म्हणतात. तसेच समुद्राच्या लाटा, भरती-ओहोटी आणि समुद्रातील पाण्याच्या हालचालींचा उपयोग करूनही ऊर्जा निर्माण करता येते. या ऊर्जास्रोतांचा वापर सध्या तुलनेने मर्यादित असला, तरी भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो.

अक्षय ऊर्जा ही पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढते. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढणे आणि हवामान बदल यांसारख्या समस्या निर्माण होतात. याउलट, सौर, पवन आणि जलऊर्जे सारख्या अक्षय ऊर्जास्रोतांचा वापर केल्यास जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करता येते.

अक्षय ऊर्जेमुळे वायू प्रदूषण कमी करण्यास, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. तसेच हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करून हवामान बदलाच्या परिणामांना आळा घालण्यास मदत मिळते. त्यामुळे स्वच्छ हवा, निरोगी पर्यावरण आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्यासाठी अक्षय ऊर्जेचा अधिकाधिक वापर करणे ही काळाची गरज आहे.

अक्षय ऊर्जा क्षेत्रामुळे नवीन उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. सौर पॅनेल, पवनचक्क्या, बॅटरी, ऊर्जा-साठवण आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो. स्थानिक पातळीवर ऊर्जा निर्मिती झाल्यास ऊर्जा उपलब्धता वाढण्यास मदत होते. तसेच दीर्घकाळात जीवाश्म इंधनाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होऊ शकते. भारतासारख्या विशाल आणि विविध भौगोलिक परिस्थिती असलेल्या देशात अक्षय ऊर्जेला मोठे महत्त्व आहे. भारतात वर्षातील अनेक दिवस भरपूर सूर्यप्रकाश उपलब्ध असल्यामुळे सौर ऊर्जेची क्षमता मोठी आहे. तसेच विविध प्रदेशांमध्ये पवन, जल आणि जैव ऊर्जेचा उपयोग करता येतो. स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने भारताच्या वाटचालीत अक्षय ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

अक्षय ऊर्जेचे अनेक फायदे असले तरी तिच्यासमोर काही आव्हाने आहेत. सौर आणि पवन ऊर्जा सूर्यप्रकाश व वाऱ्यावर अवलंबून असल्यामुळे त्यांचे उत्पादन सतत समान राहात नाही. त्यामुळे वीज साठवण्यासाठी बॅटरी आणि आधुनिक ऊर्जा-साठवण तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. तसेच सौर प्रकल्प, पवन प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधांसाठी सुरुवातीला मोठी गुंतवणूक आवश्यक असते. योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ही आव्हाने कमी करता येऊ शकतात.

अक्षय ऊर्जेच्या प्रसारात प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे. वीजेचा अनावश्यक वापर टाळणे, ऊर्जा बचत करणे आणि शक्य असल्यास सौर ऊर्जेसारख्या पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शाळा, महाविद्यालये आणि समाजामध्ये ऊर्जा बचत व पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करावी. ऊर्जा वाचवा, पर्यावरण वाचवा हा संदेश केवळ घोषवाक्य न ठेवता आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उतरवणे हीच खरी जबाबदारी आहे. भविष्यात सौर पॅनेल, आधुनिक पवनचक्क्या, अत्याधुनिक बॅटरी, हरित हायड्रोजन आणि स्मार्ट ग्रिड यांसारख्या तंत्रज्ञानामुळे अक्षय ऊर्जेचा वापर आणखी वाढण्याची शक्यता आहे. ऊर्जा निर्मिती आणि साठवणुकीतील नवीन तंत्रज्ञानामुळे स्वच्छ ऊर्जा अधिक कार्यक्षम आणि सर्वांसाठी उपलब्ध होऊ शकते. म्हणूनच अक्षय ऊर्जा ही केवळ आजची गरज नसून उद्याच्या स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत जगाची पायाभरणी आहे.

निसर्गाची शक्ती स्वीकारूया,
स्वच्छ ऊर्जेने भविष्य घडवूया!

अक्षय ऊर्जा ही केवळ ऊर्जेची गरज पूर्ण करणारी व्यवस्था नसून निसर्ग, मानव आणि भविष्य यांना जोडणारा आशेचा किरण आहे. सूर्याची अमर्याद ऊर्जा, वाऱ्याची शक्ती, पाण्याचा प्रवाह आणि निसर्गातील इतर स्रोतांचा सुयोग्य वापर करून आपण प्रदूषणमुक्त आणि शाश्वत भविष्य घडवू शकतो. आज आपण अक्षय ऊर्जेचा स्वीकार केला, तर उद्याच्या पिढ्यांना स्वच्छ हवा, निरोगी पर्यावरण आणि सुरक्षित जीवन देऊ शकतो. म्हणूनच आता फक्त विचार करण्याची वेळ नाही, तर कृती करण्याची वेळ आहे!

निसर्गाची शक्ती जपूया, अक्षय ऊर्जेला साथ देऊया;
आजची ऊर्जा वाचवूया, उद्याचे भविष्य घडवूया!

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# ‘आधी पुनर्वसन मग धरण’; लेंडी प्रकल्पग्रस्तांचे जलसमाधी आंदोलन, प्रशासनाला ८ दिवसांची मुदत

## हसनाळसह परिसरातील शेकडो कुटुंबे बेघर; ठोस निर्णय न झाल्यास पुन्हा उग्र आंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील लेंडी मध्यम प्रकल्पामुळे बाधित झालेल्या हसनाळ (प.मु.) व परिसरातील नागरिकांनी शासनाच्या उदासीन धोरणाचा तीव्र निषेध करत मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी थेट धरणात उतरून ‘जलसमाधी’ आंदोलन छेडले. संतप्त ग्रामस्थांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. अखेर प्रशासनाने पुढील ८ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर या आंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली.



आंदोलकांनी संतप्त सवाल उपस्थित केला की, शासनाचे आधी पुनर्वसन, मग धरण हे धोरण बंधनकारक असतानाही पुनर्वसन पूर्ण न करताच धरणात पाणीसाठा म्हणजेच गाळभरणी करण्यास परवानगी कशी दिली?

या प्रकल्पामुळे आतापर्यंत ५ जणांचा नाहक बळी गेला असून शेकडो कुटुंबे बेघर झाली आहेत. या दुर्दैवी घटनेला एक वर्ष पूर्ण होत आले तरीही प्रकल्पग्रस्तांना अद्याप न्याय मिळालेला नाही.

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ – समानतेचा अधिकार आणि अनुच्छेद २१– सन्मानाने जगण्याचा अधिकार नुसार प्रकल्पग्रस्तांना सुरक्षित पुनर्वसन व मूलभूत सुविधा देणे ही शासनाची वैधानिक जबाबदारी असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले होते. प्रशासनाला शेकडो निवेदने देऊनही दाद मिळत नसल्याने दि. ७ ऑगस्ट रोजी नागरिकांनी जलसमाधीचा इशारा दिला होता.

आजच्या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप केला. पुढील ८ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक लावून मागण्यांवर तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिल्याने प्रकल्पग्रस्तांनी सध्या माघार घेतली आहे.

मात्र, या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यास पुन्हा उग्र आंदोलन छेडले जाण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे. आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष जिल्हाधिकाऱ्यांसोबत होणाऱ्या या महत्त्वपूर्ण बैठकीकडे लागले आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा परभणीमधील तक्रारदारांशी ‘संवाद’



**नांदेड (प्रतिनिधी)**– नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस – नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत ‘जनसंवाद’ उपक्रम सुरू केला आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उपमहानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे.

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक, परभणी कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर दुपारी ३ ते ०४.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी ‘संवाद’ साधला. यादरम्यान एकूण १८ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात मालमत्ताविषयक वाद, पोलीस संरक्षण, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच ‘संवेदना’ ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी ‘जनसंवाद’ उपक्रमादरम्यान प्राप्त झालेले सर्व अर्ज ‘संवेदना’ पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, जिल्ह्यातील उपविभागीय पोलीस अधिकारी व परभणी शहरातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

## कृष्णा कुंटूरकर यांची राज्यकर निरीक्षकपदी निवड

**नायगाव (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील कुंटूर येथील सामान्य कुटुंबातील युवक कृष्णा गोविंदराव



कुंटूरकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. राज्यकर निरीक्षक पदासाठी १७ मे २०२६ रोजी झालेल्या परीक्षेचा निकाल १४ ऑगस्ट रोजी जाहीर झाला. यात कृष्णा कुंटूरकर यांनी ओबीसी प्रवर्गातून राज्यात २० वा क्रमांक पटकावला. या यशाचे श्रेय त्यांनी वडील व भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंदराव कुंटूरकर, आई अंजनाबाई तसेच गुरुजनांना दिले. भविष्यात वर्ग-१च्या पदासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या यशाबद्दल ज्येष्ठ पत्रकार रामराव पाटील ढगे, कैलास तेलंग, गंगाधर गंगासागरे, गोविंद टोकलवाड यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

## तेलंगणा अपघातप्रकरणी दोषींवर कारवाईची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**किनवट (प्रतिनिधी)**– तेलंगणाच्या निझामाबाद जिल्ह्यातील आरमूर येथे दि. १३ ऑगस्ट रोजी घडलेल्या भीषण रस्ते अपघाताची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक नेम्मानीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत नेम्मानीवार यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, किनवट व परिसरातील सुमारे ६० ते ६५ महिला दि.१३ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथील चिन्ना जियार स्वामी यांच्या आश्रमात दर्शनासाठी जात असताना राष्ट्रीय महामार्ग ४४ वर आरमूर जि. निजामबाद परिसरात रस्त्याच्या बाजूला नादुरुस्त





अवस्थेत असलेल्या भाविकांच्या खासगी बसला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली. या भीषण दुर्घटनेत अशोक नेम्मानीवार यांच्या पत्नी सौ. सुजाता नेम्मानीवार व सौ. माधवी तिरमनवार (किनवटकर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर जखमींना दीड तास तातडीची मदत मिळाली नाही. तसेच, खासगी कंपनीच्या बसचे टायर फुटल्याने बस रस्त्यात सुमारे दोन तास चुकीच्या दिशेने उभी होती. लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी वापरण्यात आलेल्या या बसची फिटनेस आणि टायर्सची गुणवत्ता योग्य होती का, याची चौकशी आवश्यक होती. बसचालक, मालक, तेलंगणा वाहतूक व्यवस्था, महामार्ग आपत्कालीन यंत्रणा तसेच यात्रेचे आयोजक आणि चिन्ना जियार स्वामी आश्रम व्यवस्थापनाच्या भूमिकेची सखोल चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. या अपघातास कारणीभूत असणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तेलंगणा राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशीचे आदेश द्यावेत, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि मृतकांच्या कुटुंबांना व जखमी भाविकांना योग्य शासकीय मदत मिळवून द्यावी, अशीही मागणी अशोक नेम्मानीवार यांनी केली आहे.

## जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते शेवगा पावडर प्रक्रिया युनिटचा शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)**– किनवट तालुक्यातील मौजे बोधडी (परिसर) येथे आदिवासी शेतकऱ्यांच्या शेवगा उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड देत उभारण्यात आलेल्या शेवगा प्रक्रिया युनिटचा उद्घाटन सोहळा सोमवार, १७ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या प्रक्रिया युनिटचे उद्घाटन करण्यात आले.

वनश्री आदिवासी शेतकरी उत्पादक गट बोधडी बु. यांच्याकडे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट, कृषी विभाग तसेच अती प्रभावित मेगा पाणलोट प्रकल्प महाराष्ट्र यांच्या समन्वयातून हा नावीन्यपूर्ण उपक्रम साकारण्यात आला आहे. आदिवासी व ग्रामीण भागातील



शेतकऱ्यांना केवळ शेती उत्पादनावर अवलंबून न ठेवता त्यांच्या उत्पादनावर प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकिंग व बाजारपेठेची जोड देऊन उत्पन्नाचे शाश्वत स्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीमालाचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून त्याची बाजारातील किंमत वाढविणे गरजेचे आहे. हीच संकल्पना केंद्रस्थानी ठेवून नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनातून शेवगा प्रक्रिया युनिट उभारणीच्या उपक्रमाला चालना मिळाली.

याच बरोबर १७ ऑगस्टपासून सुरू असलेल्या २ रेशीम प्रशिक्षण वर्ग मधील एकूण साधारण ६० रेशीम उत्पादक शेतकरी यांना कौशल्य विकास प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला व त्याप्रसंगी सर्व प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. प्रकल्पाच्या माध्यमातून शेती, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतकरी उत्पन्नवाढ आणि ग्रामीण उपजीविका बळकटीकरण यांना जोड देण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून शेवगा प्रक्रिया उद्योगाकडे पाहिले जात आहे.

उद्घाटन सोहळ्यास डॉ. बी. सरवनन, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी किनवट हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी कैलास जायभाये, डॉ. अशोक वडवळे विक्रांत देहानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कारला जिल्हा परिषद शाळेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे यश

**उमरी (प्रतिनिधी)**– तालुक्यातील मौजे कारला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा उंचावला आहे. इयत्ता चौथीतील तब्बल दहा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत शाळेचे, पालकांचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेष सत्कार समारंभ आयोजित करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये बालाजी वंचेवाड, अफानखा पठाण, अलीना पठाण, स्नेहा पवळे, सुगत राजू वाघमारे, पार्वती दत्ता नवरखेले, तन्वेश भीमराव पवार, श्रद्धा भोपाळे, जोया मुजीब बेग आणि मोहन पवळे यांचा समावेश आहे.



विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, सातत्यपूर्ण सराव आणि गुणवत्तेची भक्कम साथ असून, त्यासोबतच शाळेतील शिक्षकांच्या प्रभावी मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. मुख्याध्यापक खंडू नागरगोजे, शिक्षक नामदेव मुंडे, शिवरत्न पंतुलवार, पंचकीरन कंधारे, ज्ञानोबा मुंडे, तसेच सौ. वसुधा पाठक मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन, सराव व प्रोत्साहन दिले.

शिष्यवृत्ती परीक्षेची नियोजनबद्ध तयारी, प्रश्नपत्रिकांचा सराव आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी शिक्षकांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे कारला जिल्हा परिषद शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## राहूल गांधी यांच्या छात्रोंकी गुंज कार्यक्रमात युवतींनी सहभाग घ्यावा –खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते खा. राहूल गांधी यांचा छात्रोंकी गुंज महिला विशेष हा महा कार्यक्रम शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी पुणे येथे होत असून, मुलींच्या प्रश्नांना, स्वप्नांना व संघर्षाला हक्काचं व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे युवतींनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी केले आहे.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली छात्रोंकी गुंज हा विद्यार्थ्यांच्या समस्या, पेपर फुटी आणि शिक्षण व्यवस्थेविषयी संवाद साधणारा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. आजवर कोटा, डेहराडून व प्रयागराज या तीन ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न झाला असून, विद्यार्थी वर्गाचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान खा. राहूल गांधी यांच्या उपस्थितीत, पुणे येथील एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे शनिवार, दि. २२ रोजी सायंकाळी पाच वाजता छात्रोंकी गुंज महिला विशेष हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुलींच्या प्रश्नांना, स्वप्नांना व संघर्षाला हक्काचं व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे युवतींनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन खा. रवींद्र चव्हाण, विठ्ठल पावडे व अब्दुल गफ्फार यांनी केले आहे.

## स्वच्छ यशवंत परिसर अभियान उत्साहात संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्वच्छ यशवंत समितीतर्फे यशवंत महाविद्यालय येथे ‘स्वच्छ यशवंत परिसर’ अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला.

या अभियानात माजी प्र–कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे अध्यक्ष प्रा. साहेबराव माने, सदस्य डॉ. शिवाजी सूर्यवंशी, डॉ. साईनाथ बिंदगे, प्रा. नारायण गव्हाणे, डॉ. रोहिणी चव्हाण, डॉ. बालाजी भोसले व डॉ. ज्ञानेश्वर पुपुलवाड उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा संकलित केला. स्वच्छ व सुंदर परिसर निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असा संदेश प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी दिला.

अभियानाच्या यशस्वीतेसाठी शंकर मिरेवाड, परमेश्वर राठोड, जगदीश उमरीकर आणि प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे ‘स्वच्छ यशवंत परिसर’ अभियान यशस्वीपणे पार पडले.

## एलसीबीच्या पथकाडून फरार आरोपीला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांतील फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. पोलीस स्टेशन बारड येथील गु.र.नं. ११३/२०२५, कलम ३०९(६), ३१०, ३१२ BNS मधील फरार आरोपीस अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे.

दि. १७ ऑगस्ट रोजी एलसीबीचे पोउपनि साईनाथ पुयड व त्यांचे पथक फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी नांदेड शहरात गस्त घालत होते. दरम्यान, पोलीस स्टेशन वजिराबाद हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, बारड पोलीस ठाण्यातील जबरी चोरीतील फरार आरोपी आकाश प्रकाश मोकळे हा चोरीचा मोबाईल विक्रीसाठी मोनार्क कॅन्सर हॉस्पिटल परिसरात येणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे मोनार्क कॅन्सर हॉस्पिटल परिसरात सापळा रचला. त्यावेळी संशयास्पद हालचाल करणाऱ्या एका इसमाला ताब्यात घेतले. त्याने आपले नाव आकाश प्रकाश मोकळे वय २४ वर्षे, रा. नेरली, ता. जि. नांदेड असे सांगितले. त्याच्या अंगझडतीत Vivo कंपनीचा पांढऱ्या रंगाचा अँड्रॉईड मोबाईल मिळून आला. कसून चौकशीत आरोपीने कबुली दिली की, त्याने त्याच्या साथीदारांसह प्रेम नागेश हटकर, मयूर उर्फ मोनू लापे रा. झेंडा चौक, नांदेड, अर्पण आवटे रा. सांगवी, अनिकेत साहेबराव नरवाडे रा. छत्रपती चौक, नांदेड यांनी बारड ठाण्याच्या हद्दीतील आंबेगाव पाटीवर स्कुटीवरून जाणाऱ्या एका व्यक्तीस अडवले. सर्वांनी मिळून त्याला चाकूने मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल फोन व स्कुटी घेऊन फरार झाले होते.

## जय हनुमान सहकारी संस्थेच्या नावाने फसवणूक; गुन्हा दाखल झालेल्या सहा जणांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट कलम वाढवावी; तक्रारकर्त्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील धनेगाव–मुजामपेठ आणि बळीरामपूर येथील जय हनुमान मागासवर्गीय सहकारी संस्था आणि प्लॉटधारकांची खोटे दस्तऐवज तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी ६ आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. मात्र तक्रारकर्ता मागासवर्गीय समाजातून येत असल्याने या प्रकरणात ॲट्रॉसिटी ॲक्टची कलम वाढ व्हावी अशी मागणी त्यांनी केली आहे. ही कलम वाढविल्यास आरोपींना लवकर जामीन मिळणार नाही असेही त्यांनी सांगितले.

फसवणूक झालेले माधव उमाजी झुरेकर (वय ३८, रा. इस्लापूर, ता. किनवट, ह.मु. हडको, नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पुढील ६ आरोपींनी संगनमत करून खोटे दस्तऐवज तयार करून ते खरे असल्याचे भासवले आणि संस्थेसह इतर प्लॉटधारकांची फसवणूक केली होती.

फसवणूक करणाऱ्या आरोपीतांमध्ये गंगाधर जयराम सोनटक्के, रा. धनेगाव, नांदेड, खातुनबी शेख जफर, रा. धनेगाव, नांदेड, सय्यद महेबूब सय्यद अहेमदसाब, रा. उस्माननगर, अत्तार सुग्राबी सय्यद महेबूब, रा. उस्माननगर, शबनम बेगम मोहम्मद साजीद इरफान, रा. खदबेनगर, इतवारा आणि मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसूफ खान, रा. उमरकॉलनी, नांदेड यांचा सहभाग आहे.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९५५/२०२६ नुसार भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि भिसे करत आहेत. या प्रकरणात स्वतः पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी अखेर गुन्हा दाखल केला होता. मात्र या प्रकरणात ॲट्रॉसिटी ॲक्टची कलम वाढवावी अशी मागणी तक्रारकर्त्याने केली आहे.

# लोहा शहरात गणेशमूर्ती बनविण्याच्या कामाला वेग

**लोहा (प्रतिनिधी)**–महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सव अवघ्या वीस ते पंचवीस दिवसांवर येऊन ठेपला असून, गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मूर्तिकारांचे हात आता वेगाने चालू लागले आहेत. लोहा शहरातही गणेशमूर्ती बनविण्याच्या कामाला चांगलाच वेग आला आहे.

लोहा शहरातील सुप्रसिद्ध मूर्तिकार ज्ञानेश्वर जोरूळे यांच्या मूर्ती कारखान्यात आकर्षक व विविध रूपांतील गणेशमूर्ती तयार करण्यात येत आहेत. त्यांच्या मूर्तींना नांदेड, लातूर, परभणी, हिंगोलीसह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातील व्यापाऱ्यांकडून मोठी मागणी असल्याचे दिसून येत आहे.



यावर्षी जोरूळे यांच्या कारखान्यात अर्ध्या फुटापासून तब्बल १२ फुटांपर्यंतच्या गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. महादेव, श्रीकृष्ण, हत्ती, लालबागचा राजा, मल्हार, बालाजी, नृसिंह अवतार, चंद्रकोर, शिवपार्वती, हनुमान, दगडूशेठ तसेच अष्टविनायकांच्या विविध वेशभूषेतील आकर्षक मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत.

गणरायाच्या मूर्तींची उंची वाढत असून, मोठ्या मूर्ती घडविण्यासाठी मोठी जागाही आवश्यक ठरत आहे. मोठी मूर्ती तयार करण्यासाठी साधारणतः २० ते २५ दिवसांचा कालावधी लागतो. मागणी वाढल्यामुळे मूर्तिकारांमध्ये स्पर्धाही वाढली असून, गणेशमूर्तींची मागणी वर्षभर होत असल्याने मूर्ती बनविण्याचा व्यवसायही आता बारमाही झाला आहे.

पूर्वी मूर्तींच्या किमती तुलनेने कमी होत्या. मातीच्या मूर्तींना मर्यादित मागणी होती. मात्र गणेशोत्सव साजरा करण्याचे प्रमाण वाढले असून, गणेश मंडळांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे आकर्षक आणि मोठ्या आकाराच्या मूर्तींना मागणी वाढली आहे.

दरम्यान, गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीवर जीएसटी आकारला जात असल्याने मूर्तींच्या किमतीत वाढ झाली आहे. दुसरीकडे, मराठवाड्यात कमी पावसाचे सावट असल्याने बाजारपेठेवर मंदीची छाया जाणवत असली तरी गणेशमूर्तींच्या मागणीत मात्र उत्साह कायम आहे. जवळपास विविध तालुक्यातून गणेश मंडळाची जोरूळे यांच्या मूर्ती कारखान्यात मूर्ती खरेदीसाठी गर्दी होत आहे.

# अंतर्मन



# जिवंत माशांच्या पाण्यातून वाट काढत घ्यावे लागते शिवदर्शन!

## केशवनाथेश्वर मंदिरात निसर्ग अन् भक्तीचा अनोखा संगम

**दक्षिण भारतातील मंदिरे केवळ श्रद्धेची केंद्रे नाहीत, तर निसर्गाच्या अद्भुत सौंदर्याशी जोडलेली स्थळेही आहेत. कर्नाटकातील मुदूर गावाजवळील केशवनाथेश्वर मंदिर हे त्याचे वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे. जंगलाच्या सान्निध्यात, गुहेत वसलेल्या या मंदिरात भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी पाण्यातून जावे लागते. या पाण्यात असलेल्या असंख्य माशांमधून वाट काढत भाविक शिवलिंगाचे दर्शन घेतात. त्यामुळे या मंदिराचा अनुभव इतर मंदिरांपेक्षा निश्चितच वेगळा ठरतो.**

» जंगलातून जावे लागते मंदिराकडे : केशवनाथेश्वर मंदिर कर्नाटकातील कुंदापूरजवळील मुदूर गावात आहे. उडुपीपासून कुंदापूरमार्गे हे ठिकाण सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर असल्याचे सांगितले जाते. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी जंगलातून जावे लागते. थेट मंदिराच्या दारापर्यंत पोहोचणारा रस्ता नसल्याने काही अंतर पायी चालावे लागते. जंगलातून पुढे गेल्यानंतर एक गुहा दिसते. याच गुहेच्या आत केशवनाथेश्वर मंदिर आहे. गुहेतील गर्भगृहात कायम पाणी साचलेले असते. त्यामुळे भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना या पाण्यातूनच पुढे जावे लागते.

» गर्भगृहातील पाण्यात असतात मासे... : या मंदिराचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे गर्भगृहात असलेले स्वच्छ पाणी आणि त्यातील मासे. पाण्याची पातळी वर्षभर कायम असल्याचे सांगितले जाते. उन्हाळ्यातही हे पाणी आटत नाही. गर्भगृहातील पाणी इतके स्वच्छ असल्याचे सांगितले जाते की त्यामधील मासे सहज दिसतात. मंदिरात येणारे काही भाविक या माशांना खाद्यही देतात. त्यामुळे येथे निसर्ग आणि धार्मिक श्रद्धेचा अनोखा अनुभव एकाच वेळी घेता येतो.

» मंदिरात दोन शिवलिंगे : केशवनाथेश्वर मंदिरातील गर्भगृहात दोन शिवलिंगे असल्याचे सांगितले जाते. त्यापैकी एक स्वयंभू शिवलिंग असल्याची भाविकांची श्रद्धा आहे, तर दुसरे शिवलिंग शिवभक्तांनी स्थापित केलेले आहे. या मंदिराबाबत स्थानिक पातळीवर विविध धार्मिक श्रद्धा प्रचलित आहेत. मंदिरात दर्शन घेतल्याने जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते, अशीही मान्यता आहे. मात्र, या श्रद्धा धार्मिक परंपरेचा भाग आहेत.

» पावसाळ्यात मंदिराचे सौंदर्य अधिक खुलते : पावसाळ्यात परिसरातील पाण्याची पातळी वाढते. त्यामुळे गुहा, जंगल आणि मंदिराचा परिसर अधिकच निसर्गरम्य दिसतो. जून ते सप्टेंबर हा कालावधी येथे भेट देण्यासाठी विशेष आकर्षक मानला जातो. याशिवाय नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळातही वातावरण आल्हाददायक असल्याने मंदिराला भेट देता येते.

### सकाळी 6 ते सायंकाळी 7 पर्यंत दर्शन

मंदिराचे दरवाजे सकाळी ६ वाजता उघडतात आणि सायंकाळी ७ वाजेपर्यंत दर्शन घेता येते, अशी माहिती देण्यात आली आहे. कुंदापूर परिसरातून बस किंवा खासगी वाहनाने मंदिराच्या परिसरापर्यंत जाता येते. मात्र, त्यानंतर काही अंतर पायी पार करावे लागते. निसर्गाच्या कुशीत वसलेले मंदिर, गुहेतील गर्भगृह, पाण्यातील मासे आणि भगवान शिवाचे दर्शन या सगळ्यामुळे केशवनाथेश्वर मंदिराचा अनुभव भाविकांसाठी आगळावेगळा ठरतो. श्रद्धा आणि निसर्ग यांचा असा अनोखा संगम पाहायचा असेल, तर हे मंदिर निश्चितच लक्षवेधी ठरते.

# दिवसरात्र पूजा-पाठ करूनही फळ का मिळत नाही?

अनेक जण दिवसरात्र पूजा, पाठ आणि भक्ती करतात; मात्र आपल्या मनोकामना पूर्ण होत नसल्याची त्यांची भावना असते. दुसरीकडे काही जण फार मोठी पूजा किंवा साधना न करताही थोडेसे दान-पुण्य आणि सत्कर्म करतात आणि त्यांना त्याचे सकारात्मक परिणाम जाणवतात. असे का होते? धार्मिक मान्यतेनुसार यामागे केवळ पूजा-पाठाचे प्रमाण नव्हे, तर आचरण, निःस्वार्थ भावना आणि इतरांच्या सेवेला असलेले महत्त्व कारणीभूत असते. या विषयाचे महत्त्व समजून घेण्यासाठी भगवान शिवाशी संबंधित एक प्राचीन कथा सांगितली जाते.

एकदा श्रावण महिन्यात एका प्रसिद्ध शिवमंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. त्याच वेळी अचानक आकाशातून एक सोन्याची ताटली प्रकट झाली. त्यासोबत अशी आकाशवाणी झाली की, जो कोणी भगवान शिवाचा खरा भक्त असेल, त्याला आशीर्वाद म्हणून ही सोन्याची ताटली मिळेल. हे ऐकताच अनेक साधू, संत, दानी आणि भक्तांनी ती ताटली मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. सर्वप्रथम मंदिराचे मुख्य पुजारी पुढे आले. ते म्हणाले, "मी दररोज भगवान शिवाचा अभिषेक करतो. त्यामुळे मी महादेवांचा सर्वांत जवळचा भक्त आहे. ही सोन्याची ताटली मलाच मिळायला हवी." पुजाऱ्यांनी ताटली उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्या हातात येताच सोन्याची ताटली पितळेची झाली. यानंतर मंदिरात उपस्थित असलेल्या अनेकांनी स्वतःला खरा भक्त सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कोणालाही ती सोन्याची ताटली मिळाली नाही. मंदिराच्या उभारणीसाठी मोठी रक्कम दान करणाऱ्या एका व्यक्तीनेही ताटली उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यालाही यश मिळाले नाही. त्याच वेळी मंदिरात एक सामान्य व्यक्ती आली. त्यानेही सोन्याच्या ताटलीबाबतची भविष्यवाणी ऐकली होती. मात्र, तो भगवान शिवाच्या दर्शनात इतका तल्लीन झाला होता की, त्याला त्या ताटलीची कोणतीही चिंता नव्हती. पूजा करून तो मंदिरातून बाहेर पडत असताना कोणीतरी त्याला सांगितले, "मंदिरात आलेल्या सर्वांनी ताटली उचलण्याचा प्रयत्न केला आहे. तुम्हीही प्रयत्न करून पाहा. कदाचित तुम्हीच खरे शिवभक्त असाल." त्या व्यक्तीने सहजपणे ताटली उचलली. त्याच्या हातात येताच ताटली पुन्हा सोन्यासारखी चमकू लागली. हे पाहून उपस्थित भाविकांनी भगवान शिवाचा जयघोष केला. अशा प्रकारे त्या व्यक्तीची निःस्वार्थ आणि खरी भक्ती अधोरेखित झाली.

# मृत्यूनंतर आत्मा आपल्या प्रियजनांशी संपर्क साधते का? गरुड पुराणानुसार जाणून घ्या...

**मृत्यू हे मानवी जीवनातील एक गूढ आणि अंतिम सत्य मानले जाते. मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते, ती कुठे जाते आणि तिचा आपल्या प्रियजनांशी काही संबंध राहतो का, असे अनेक प्रश्न मानवी मनात निर्माण होतात. हिंदू धर्मग्रंथांमध्ये आत्मा, मृत्यू आणि परलोक याविषयी विविध प्रकारच्या धार्मिक आणि आध्यात्मिक संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. गरुड पुराणातही मृत्यूनंतरची अवस्था आणि आत्म्याच्या प्रवासाचे सविस्तर वर्णन आढळते. मात्र, या विषयातील धार्मिक श्रद्धा आणि वैज्ञानिक पुरावे यांची स्वतंत्रपणे चिकित्सा करणे आवश्यक आहे. आत्म्याचे अस्तित्व किंवा मृत्यूनंतर आत्मा प्रियजनांशी संपर्क साधतो, याला आधुनिक विज्ञानाने निश्चितपणे सिद्ध केलेले नाही.**



## आत्मा प्रियजनांशी संपर्क साधते का?

आध्यात्मिक मान्यतेनुसार आत्मा ही शरीरापेक्षा वेगळी आणि सूक्ष्म चेतन सत्ता आहे. मृत्यूच्या वेळी किंवा त्यानंतर आत्मा आपल्या जवळच्या व्यक्तींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करू शकते, अशी धारणा आहे. हा संपर्क प्रत्यक्ष स्वरूपात होण्याऐवजी विचार, भावना किंवा मानसिक अनुभूतीच्या माध्यमातून होऊ शकतो, असे या आध्यात्मिक मतांमध्ये सांगितले जाते. एखाद्या दिवंगत व्यक्तीची अचानक आठवण येणे, स्वप्नात त्या व्यक्तीचे दर्शन होणे किंवा तिच्याशी संबंधित एखादी तीव्र भावना जाणवणे, यांचा काही जण आत्म्याच्या संपर्काशी संबंध जोडतात.

## मृत्यू म्हणजे 'आत्मिक मूर्च्छा'?

या आध्यात्मिक विवेचनात मूर्च्छेचे तीन प्रकार सांगितले आहेत, शारीरिक मूर्च्छा, मानसिक मूर्च्छा आणि आत्मिक मूर्च्छा. यापैकी आत्मिक मूर्च्छेला मृत्यूशी जोडले जाते. या अवस्थेत आत्म्याचा शरीराशी असलेला संबंध तुटतो, अशी धारणा आहे. ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती झोपताना नेमक्या कोणत्या क्षणी झोपली, हे तिला कळत नाही, त्याचप्रमाणे मृत्यूच्या क्षणीही शरीराचा त्याग नेमका कधी झाला, याची जाणीव आत्म्याला होत नाही, असे या आध्यात्मिक मतात सांगितले जाते.

## मृत्यू म्हणजे 'आत्मिक मूर्च्छा'?

या आध्यात्मिक विवेचनात मूर्च्छेचे तीन प्रकार सांगितले आहेत, शारीरिक मूर्च्छा, मानसिक मूर्च्छा आणि आत्मिक मूर्च्छा. यापैकी आत्मिक मूर्च्छेला मृत्यूशी जोडले जाते. या अवस्थेत आत्म्याचा शरीराशी असलेला संबंध तुटतो, अशी धारणा आहे. ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती झोपताना नेमक्या कोणत्या क्षणी झोपली, हे तिला कळत नाही, त्याचप्रमाणे मृत्यूच्या क्षणीही शरीराचा त्याग नेमका कधी झाला, याची जाणीव आत्म्याला होत नाही, असे या आध्यात्मिक मतात सांगितले जाते.

## आत्म्यासाठी काळ आणि अवकाशाची मर्यादा नसते?

आध्यात्मिक विचारसरणीनुसार आत्मा सूक्ष्म स्वरूपाची असल्याने तिच्यासाठी काळ आणि अवकाशाच्या भौतिक मर्यादा लागू होत नाहीत. त्यामुळे आत्मा अतिशय कमी वेळेत दूरवर पोहोचू शकते किंवा एकाच वेळी अनेक ठिकाणांशी संबंधित अनुभव घेऊ शकते, अशी धार्मिक धारणा मांडली जाते. या संकल्पनेत आत्म्याला चेतनेचे सूक्ष्म स्वरूप मानले जाते. मात्र, अशा दाव्यांना आधुनिक विज्ञानाचा ठोस आधार उपलब्ध नाही. त्यामुळे त्याकडे आध्यात्मिक श्रद्धा आणि तत्त्वज्ञानाचा भाग म्हणून पाहणे योग्य ठरेल.

## विचार आणि भावनांच्या माध्यमातून संदेश?

आध्यात्मिक मान्यतेनुसार आत्मा आपल्या प्रिय व्यक्तीच्या मनावर विचार किंवा भावनांच्या माध्यमातून प्रभाव टाकू शकते. दिवंगत व्यक्तीशी संबंधित एखादा विचार अचानक मनात येणे किंवा तिची तीव्र आठवण होणे, याला काही आध्यात्मिक परंपरांमध्ये आत्म्याचा संदेश मानले जाते. काही धार्मिक विचारांमध्ये आत्म्याला व्यक्तीचे विचार, भावना आणि मानसिक अवस्था जाणण्याची क्षमता असल्याचेही म्हटले आहे.

## शरीरापासून वेगळे झाल्यानंतर काय होते?

आध्यात्मिक ग्रंथांनुसार मृत्यूच्या वेळी आत्म्याचा शरीराशी असलेला संबंध तुटतो. त्यानंतर आत्मा सूक्ष्म अवस्थेत प्रवेश करते, अशी संकल्पना आहे. काही आध्यात्मिक मतांमध्ये मृत्यूनंतर शरीर हलके झाल्यासारखे वाटणे किंवा आपण हवेत तरंगत असल्याची अनुभूती येणे याचे वर्णन केले जाते. मात्र, मृत्यूच्या वेळी किंवा त्यानंतर प्रत्यक्षात आत्म्याला अशा प्रकारचा अनुभव येतो, याबाबत वैज्ञानिकदृष्ट्या निश्चित पुरावा उपलब्ध नाही.

## गरुड पुराणात मृत्यूनंतरच्या प्रवासाचे वर्णन

हिंदू धर्मपरंपरेत गरुड पुराणाला मृत्यू, आत्मा, कर्म आणि परलोक यांविषयी माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ मानले जाते. मृत्यूनंतर आत्म्याचा प्रवास, कर्मानुसार मिळणारी गती आणि परलोकातील विविध अवस्था यांचे वर्णन त्यात आढळते. मृत्यूनंतर आत्मा आपल्या प्रियजनांशी संपर्क साधते का, हा प्रश्न मात्र धार्मिक श्रद्धा, आध्यात्मिक अनुभव आणि वैयक्तिक समजुतींशी संबंधित आहे. त्यामुळे अशा अनुभवांकडे श्रद्धेच्या दृष्टीने पाहताना वैज्ञानिक पुराव्यांची मर्यादाही लक्षात घेणे आवश्यक आहे.



**टीप : या लेखातील आत्मा, मृत्यूनंतरचा प्रवास आणि प्रियजनांशी संपर्क यासंबंधीचे उल्लेख धार्मिक व आध्यात्मिक मान्यतांवर आधारित आहेत. त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले तथ्य समजू नये.**

# या तारखांना जन्मलेल्या मुली आपल्या निर्णयांनी करतात सर्वांना आश्चर्यचकित!

**अंकशास्त्रानुसार जन्मतारीख व्यक्तीच्या स्वभाव आणि व्यक्तिमत्त्वाबाबत काही संकेत देत असल्याचे मानले जाते. प्रत्येक मूलांकाचा एका विशिष्ट ग्रहाशी संबंध असल्याचे अंकशास्त्रात सांगितले जाते. त्या ग्रहाच्या प्रभावामुळे व्यक्तीच्या स्वभावात काही विशिष्ट गुण निर्माण होतात, अशी मान्यता आहे. अंकशास्त्र तज्ज्ञ वास्तुगुरू मान्या यांच्या मते, काही विशिष्ट तारखांना जन्मलेल्या मुली स्वभावाने अत्यंत अंतर्मुख आणि गूढ असतात. त्या आपल्या मनातील भावना किंवा भविष्यातील योजना प्रत्येकासोबत सहजपणे शेअर करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनात नेमके काय सुरू आहे, हे समजून घेणे अनेकदा कठीण जाते. मात्र, हे दावे अंकशास्त्रातील श्रद्धा आणि मान्यतांवर आधारित आहेत. त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले तथ्य समजू नये.**

## 4, 13, 22 आणि 31 तारखेला जन्मलेल्या मुली

» राहूचा प्रभाव : अंकशास्त्रानुसार कोणत्याही महिन्याच्या ४, १३, २२ किंवा ३१ तारखेला जन्मलेल्या व्यक्तींचा मूलांक ४ असतो. अंकशास्त्रात मूलांक ४ चा संबंध राहूशी जोडला जातो. त्यामुळे या तारखांना जन्मलेल्या मुलींच्या व्यक्तिमत्त्वावर राहूचा प्रभाव असल्याचे मानले जाते.

» आपल्या योजना गुप्त ठेवतात : या मुली आपल्या आयुष्यातील योजना किंवा पुढील पाऊल सहजपणे कोणालाही सांगत नाहीत. त्या स्वतःच्या पद्धतीने निर्णय घेण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांचे पुढील पाऊल अनेकदा इतरांसाठी अनपेक्षित ठरू शकते.

» मनातील भावना लपवण्यात कुशल : ४, १३, २२ किंवा ३१ तारखेला जन्मलेल्या मुली आपल्या मनातील भावना सहज व्यक्त करत नाहीत, अशी अंकशास्त्रीय मान्यता आहे. मनात कितीही उलथापालथ सुरू असली तरी चेहऱ्यावरचे हसू कायम ठेवण्याचा त्या प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्या मनातील खरे भाव समोरच्याला सहज समजत नाहीत.

» अचानक आणि धाडसी निर्णय : आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय त्या अनेकदा अत्यंत वेगाने घेतात. त्यामुळे त्यांच्या निर्णयाने कुटुंबातील सदस्य किंवा जवळचे लोकही आश्चर्यचकित होऊ शकतात. राहूच्या प्रभावामुळे त्यांच्या आयुष्यात काही अनपेक्षित घटना घडू शकतात, असे अंकशास्त्रात मानले जाते.

## मूलांक 8 असलेल्या मुली



» शनीचा प्रभाव : ८, १७ किंवा २६ तारखेला जन्मलेल्या व्यक्तींचा मूलांक ८ असतो. अंकशास्त्रानुसार या मूलांकाचा स्वामी शनी आहे. शनीच्या प्रभावामुळे या मुली संयमी, गंभीर आणि भावनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या असतात, असे मानले जाते.

» सहज कोणावरही विश्वास ठेवत नाहीत : मूलांक ८ असलेल्या मुली कोणावरही लगेच विश्वास ठेवत नाहीत. त्या आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत गोपनीयता राखतात. त्यामुळे त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी समोरच्याला वेळ आणि सातत्य दाखवावे लागते.

» बाहेरून कठोर, आतून संवेदनशील : या मुली बाहेरून कठोर, आत्मविश्वासू किंवा भावनांना फारसे महत्त्व न देणाऱ्या वाटू शकतात. मात्र, अंकशास्त्रीय मान्यतेनुसार त्यांच्या मनात संवेदनशील भावना दडलेल्या असतात. त्या आपल्या मनातील गोष्टी सहजपणे इतरांसमोर व्यक्त करत नाहीत.

» अडचणींचा सामना स्वतःच करतात : मूलांक ८ असलेल्या मुली आपल्या अडचणी किंवा दुःख स्वतःच हाताळण्याचा प्रयत्न करतात. इतरांकडून मदत मागणे किंवा आपली समस्या कोणासमोर मांडणे त्यांना सहज आवडत नाही, असे अंकशास्त्रात सांगितले जाते.

## 7, 16 आणि 25 तारखेला जन्मलेल्या मुली

केतूचा प्रभाव : ७, १६ किंवा २५ तारखेला जन्मलेल्या व्यक्तींचा मूलांक ७ असतो. अंकशास्त्रानुसार या मूलांकाचा स्वामी केतू आहे. केतूचा संबंध अध्यात्म, सखोल विचार आणि अलिप्त वृत्तीशी जोडला जातो. या तारखांना जन्मलेल्या मुली इतरांच्या मनातील भावना आणि गुपिते समजून घेऊ शकतात; मात्र त्यांच्या स्वतःच्या मनात काय सुरू आहे, हे जाणून घेणे कठीण असते, अशी मान्यता आहे.

विनाकारण बोलणे आवडत नाही : मूलांक ७ असलेल्या मुली प्रत्येक गोष्ट खोलवर विचार करून पाहतात. त्यामुळे मनातील विचार लगेच इतरांसमोर मांडण्यापेक्षा त्या त्यावर स्वतःच विचार करणे पसंत करतात. विनाकारण बोलणे किंवा प्रत्येक विषयावर आपले मत व्यक्त करणे त्यांना आवडत नाही. त्यामुळे त्यांचा स्वभाव इतरांना काहीसा गूढ वाटू शकतो.

## जन्मतारीख आणि व्यक्तिमत्त्व यांचा संबंध?

अंकशास्त्रात जन्मतारखेच्या आधारे व्यक्तीच्या स्वभावाचे विश्लेषण केले जाते. मात्र, एखाद्या व्यक्तीचा स्वभाव केवळ जन्मतारखेवर अवलंबून असतो, असे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले नाही. व्यक्तिमत्त्व घडविण्यात कुटुंब, संस्कार, शिक्षण, अनुभव, सामाजिक वातावरण आणि वैयक्तिक निवडी यांसारख्या अनेक घटकांची भूमिका असते. त्यामुळे ही माहिती अंकशास्त्रीय मान्यतेच्या स्वरूपात घ्यावी.



# लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख अपात्र महिलांची नावं कापली

## सरकारचा आर्थिक भार कमी झाला, साडेचार लाख सरकारी कर्मचाऱ्यांकडून गैरफायदा




**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील महायुती सरकारसाठी महत्वाकांक्षी ठरलेल्या लाडकी बहीण योजनेसंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख अपात्र महिलांची नावं कापली असल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी सरकारचा आर्थिक भार कमी झाला असून तब्बल साडेचार लाख सरकारी कर्मचाऱ्यांकडून या योजनेचा गैरफायदा घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एकूण ४.५ लाखांहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांनी आणि कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे निधी लाटला, अशी माहिती माहितीच्या अधिकारात उघड झाली आहे.

दरम्यान, राज्य शासनाद्वारे राबवण्यात आलेल्या संपूर्ण पडताळणी आणि ई-केवायसी (श-घधउ) मोहिमेनंतर महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा आवाका मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. तर आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी दाखल केलेल्या आरटीआयमधून ही आकडेवारी समोर आली आहे. तर या मोहिमेमुळे सक्रिय लाभार्थी महिलांची संख्या जवळपास २.४८ कोटींवरून घसरून थेट १.६५ कोटीवर आली आहे.

दरम्यान, हजारो अपात्र शासकीय कर्मचारी कुटुंबांकडून बेकायदेशीरपणे लाटलेले पैशांची वसुली करण्याची अधिकृत यंत्रणा अद्याप ठप्प असल्याचे सांगण्यात येत आहे. आरटीआयमधून वसुलीची आकडेवारी प्राप्त झालेली नाही, अशी माहिती आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी दिली आहे. तर ईकेवायसी पूर्ण न झाल्याने दुर्गम भागातल्या गरीब महिला अजूनही योजनेपासून वंचित असल्याचा दावाही आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी केला आहे. अशातच, लाभार्थ्यांची संख्या १.६५ कोटींवर स्थिरावल्यामुळे, या योजनेचा आर्थिक भार आता दरमहा २,४८४.९२ कोटी रुपये इतका असून, वार्षिक खर्च २९,८१९.१० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. दरम्यान, ९२ लाख महिला वगळल्याची माहिती अधिकारातील खुलाशांनुसार, अपात्रतेच्या विविध निकषांच्या आधारे तब्बल ९२.१० लाख नोंदी या मोहिमेदरम्यान रद्द करण्यात आल्या आहेत

**अपात्रतेचे कारण काय? लाभार्थ्यांची संख्या किती?**

ई-केवायसी पूर्ण न केलेले – ६२,००,०००. वार्षिक कौटुंबिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त– १६,००,०००. ई-केवायसी अंतर्गत शासकीय कर्मचारी (स्वयं-घोषणेद्वारे)– ४,४२,०००. संजय गांधी निराधार योजनेचा (डत्रछध) लाभ आधीच घेत असलेले– ३,६०,०००. एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी– २,५०,०००. ६५ वर्षांच्या वयोमर्यादे पेक्षा अधिक वय– ८०,०००. जिल्हा पातळीवरील पडताळणीत वगळलेले– १,७०,०००. शासकीय कर्मचारी म्हणून ओळख पटलेले– ८,०००. एकूण अंदाजे कपात ९२,१०,०००.

प्राप्त आकडेवारीनुसार, ४.४२ लाख स्वयं-घोषित शासकीय कर्मचारांच्या कुटूंबियांनी आणि ८,००० सत्यापित शासकीय कर्मचारी अशा एकूण ४.५ लाखांहून अधिक अर्जदारांनी बेकायदेशीरपणे निधी लाटला आहे. अनधिकृत वाटपाची ही रक्कम अंदाजे ६०० कोटी ते ८०० कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचा अंदाज आहे. मंत्र्यांच्या जाहीर आश्वासनांनंतर आणि कडक वसुलीबाबत विधिमंडळात गाजावाजा केल्यानंतरही, माहिती अधिकाराच्या उत्तरात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, अपात्र शासकीय कर्मचाऱ्यांकडून निधी वसुलीबाबत कोणत्याही जिल्हा कार्यालयाकडून कोणताही अहवाल किंवा माहिती प्राप्त झालेली नाही.

पुणे पोलिसांची मोठी कारवाई; गुन्हेगार, दहशतवाद्यांमुळे महत्त्वाचं पाऊल

# भाडेकरुंची माहिती न देणाऱ्या १७० घरमालकांवर थेट गुन्हे दाखल

**पुणे (प्रतिनिधी)** – पुण्यात भाडेकरूंची माहिती न दिल्याने १७० हून अधिक घरमालकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. भाडेकरूची ओळख, कायमचा पत्ता आणि संपर्काची माहिती पोलिसांकडे नोंदवणे बंधनकारक आहे. तर भाडेकरूची माहिती नोंदविण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या घरमालकांवर पुणे पोलिसांनी कारवाई केली आहे. भाडेकरूंची पडताळणी न केल्यास शहराच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवण्यात आली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींकडून बनावट ओळख वापरून वास्तव्य करण्याचा धोका निर्माण झाला आहे. पुण्यात यापूर्वी भाड्याच्या घरात दहशतवादी कनेक्शन असलेले संशयित वास्तव्यास असल्याचे समोर आले होते. घर भाड्याने देताना ओळखपत्र, कायमचा पत्ता आणि संपर्क क्रमांकाची योग्य पडताळणी करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. संशयास्पद माहिती आढळल्यास तातडीने पोलिसांना कळवण्याचे आवाहन देखील करण्यात आलं आहे.

पोलीस उपआयुक्त (विशेष शाखा) डॉ. प्रशांत अमृतकर यांनी या प्रकरणी माहिती देताना सांगितलं की, पुणे शहरामध्ये गेल्या काही दिवसांपासून भाडेकरू पडताळणीची मोहीम सुरू आहे. ज्याच्यामध्ये घरमालकांनी किंवा पीजी ओनर असो, त्यांच्याकडील भाडेकरू किंवा पीजीमध्ये जे गेस्ट आहेत किंवा जे विद्यार्थी आहेत, त्यांची माहिती शासकीय पोर्टलवरती किंवा पोलीस यंत्रणेला ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने देणं आवश्यक आहे. या अनुषंगाने पोलीस यंत्रणेकडनं, विशेष करून विशेष शाखेकडून याच्यामध्ये मोहीम सुरू आहे आणि यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भाडेकरू पडताळणीची मोहीम सुरू असल्याने, त्यामध्ये काही बऱ्याच ठिकाणी आम्हाला त्रुटी आढळलेल्या आहेत. त्याच्यामध्ये जाणीवपूर्वक काही गोष्टी किंवा अनाधानाने ज्या ठिकाणी घडलेलं आहे अशा ठिकाणी कायदेशीर तक्रार करण्याचे काम सुरू आहे. या अनुषंगाने आतापर्यंत पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये जवळपास १७० च्या आसपास घरमालकांवरती किंवा पीजी ओनरवरती गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, अशी माहिती अमृतकर यांनी दिली आहे.

पुढे माहिती देताना अमृतकर यांनी म्हटलं आहे की, पोलिसांना माहिती देणे का बंधनकारक आहे? तर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जे टेनंट्स आहेत त्यांचे व्हॅलिडेशन होणे आणि त्यांची माहिती पोलिसांकडे असणे आवश्यक आहे. कारण की पूर्वीच्या काही घटनांचा अनुभव बघता यामध्ये ही माहिती यंत्रणेला देणे आवश्यक आहे.

सायकल शिकवण्याच्या बहाण्याने

# पिंपळवंडीत ९ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार

## नराधमाला १३ दिवसांची पोलीस कोठडी

**पुणे (प्रतिनिधी)** - पुण्याच्या नसरापूर येथील धक्कादायक घटनेतून समाजमन सावरत नाही तोच, जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका ९ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिला निर्घृणपणे संपवण्यात आल्याची काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली असून, न्यायालयाने त्याला १३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील सुनावणीदरम्यान थेट दोषारोपपत्र सादर करून आरोपीला न्यायालयात हजर करण्याची तयारी पुणे ग्रामीण पोलिसांनी सुरू केली आहे.

मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास गावात सामसूम असताना, शेजारी राहणाऱ्या आरोपीने ९ वर्षांच्या बालिकेला फुस लावून निर्मनुष्य उसाच्या शेतात नेले. तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार करून गळा दाबून तिला संपवलं. पुरावे नष्ट करण्यासाठी तिला मारहाण करून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्नही त्याने केला. मुलगी घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला आणि पोलिसांत तक्रार दाखल केली. सुरुवातीला आरोपी स्वतः निर्लज्जपणे ग्रामस्थ आणि पोलिसांसोबत शोधमोहिमेत सहभागी झाला होता. पोलिसांच्या तपासादरम्यान एक अत्यंत धक्कादायक बाब समोर आली. पोलीस आणि ग्रामस्थ जेव्हा सीसीटीव्ही फुटेज तपासत होते, तेव्हा हा आरोपीदेखील त्यांच्यासोबतच बसलेला होता. फुटेजमध्ये सायकलवरून जाणारी एक व्यक्ती दिसताच 'मीच सायकलवरून चाललोय' असं आरोपी स्वतःहून बोलून गेला आणि पोलिसांना तपासाचा पहिला महत्त्वाचा क्लू मिळाला.

त्यानंतर दुसऱ्या एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये तीच सायकल डावीकडे वळताना दिसली. आरोपीने मळ्यात गेल्याचा दावा केला होता, परंतु त्या मार्गावरील कॅमेऱ्यात तो दिसला नाही. पोलिसांचा संशय बळावताच त्याला गाडीत बसवून पोलिसी हिसका दाखवला असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तागाच्या शेतीजवळील पाईपच्या खाली चिमुकलीचा मृतदेह लपवल्याचे त्याने पोलिसांना दाखवून दिले.

घटनेचे गांभीर्य ओळखून पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी घटनास्थळी भेट दिली. आरोपीला अटक करण्यात आली असून तो शेतमजुरीचे काम करतो. या प्रकरणात तो एकटाच आरोपी आहे. पीडित बालिकेचे शवविच्छेदन सुरू आहे.

# मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांचा जलयुक्त शिवार ३.० मध्ये प्राधान्य मिळणार -मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील.

मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मराठवाड्यात शेतकऱ्यांची चिंता वाढली; पावसाची उघडीप राहण्याचा अंदाज

**परभणी (प्रतिनिधी)** – मराठवाड्यात आज आणि उद्या काही भागात पावसाची शक्यता असली, तरी त्यानंतर पावसाची मोठी उघडीप राहण्याचा अंदाज आहे. २७ ऑगस्टपर्यंत पाऊस नसण्याची शक्यता लक्षात घेता, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान शास्त्र विभागाने शेतकऱ्यांना विशेष कृषी सल्ला दिला आहे. पिकांना पाण्याचा ताण येऊ नये यासाठी पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी सूक्ष्म सिंचनाचा वापर करण्यासोबतच आवश्यकतेनुसार कीड-रोग नियंत्रणासाठी फवारणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सोयाबीनवर पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ कैलास डाखोरे यांनी केले आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे हवामान शास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं की, सध्या आज आपल्याला भारतीय हवामान विभागाने जो अंदाज दिलेला आहे हवामानाबद्दल, त्याच्यामध्ये इथून पुढचे जे पाच दिवस आहेत, त्याच्यामध्ये आज काही ठिकाणी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवलेली आहे. उद्या जवळपास आपल्याला स्कॅटर्ड आहे म्हणजेच जवळपास ५०% भागात पावसाची शक्यता आहे, छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड जिल्हा वगळता आणि बाकी ठिकाणी जर क्टिव्हिटी बघितल्या, बाकीच्या दिवसांमध्ये, फार तुरळक पाऊस आहे आणि तो पण हलक्या स्वरूपाचा आहे. आता मागचा जर १० दिवसाचा आपण आकलन केलं पावसाचं, जसं तुम्ही म्हणतात तूट आहे, तूट नक्की आहे. आपली जवळपास ४८० जे महसूल मंडळाचं किंवा महसूल मंडळाचा आपल्याला हवामान केंद्राचा डेटा प्राप्त होतो, त्याच्यानुसार मागच्या १० दिवसांमध्ये साधारणतः जे ११६ महसूल मंडळ आहेत.

# साहित्यिक आदान-प्रदानासाठी अनुवाद कार्यशाळेचे आज मुंबईत आयोजन

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत विविध भाषांच्या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा सकाळी १० वाजता प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी परिसरातील लघु नाट्यगृह, तिसरा मजला येथे होणार आहे. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. संबंधित भाषांचे जतन व संवर्धन करण्यासोबतच विविध उपक्रमांचे आयोजन आणि राज्यभाषा मराठी तसेच संबंधित भाषांमध्ये साहित्यिक आदान-प्रदानाला चालना देणे हा या अकादमींचा प्रमुख उद्देश आहे.

**टी.सी. हरवली**

माझी परमेश्वर वैजनाथ पांचाळ या नावाची बारावी (कला) पासची टी.सी. च मूळ कागदपत्र बरबडा ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.–
**संपर्क पत्ता – परमेश्वर वैजनाथ पांचाळ मो.नं. ७२७६३२९२४०**

**Change In Name**

MY OLD NAME IS **SHAIKH MAJID QURESHI** WHICH NOW I AM CHANGING AS. NEW NAME **SHAIKH MAJID SHAIKH MEHMOOD QURESHI** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSIDER THE SAME.
ADDRESS: H. NO. 4/5/91, CHANDNI CHOWK, QURESHI MOHALLA, MAULANA AZAD URDU HIGH SCHOOL, MUDKHED, TQ. MUDKHED, DIST. NANDED-431806

**टी.सी. हरवली**

माझी दिपा सुरेश डुलगच या नावाची आठवी पासची टी.सी. वाल्मिकी नगर ते रेल्वे स्टेशन ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – सुरेश नानुराम डुलगच रा. वाल्मिकी नगर, नांदेड मो.नं. ९९२१३९८२५५**

**टी.सी. हरवली**

माझी उमा सुरेश डुलगच या नावाची सातवी पासची टी.सी. वाल्मिकी नगर ते रेल्वे स्टेशन ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – सुरेश नानुराम डुलगच रा. वाल्मिकी नगर, नांदेड मो.नं. ९९२१३९८२५५**

**Change In Name**

My old name is **Digvijay Digambarao More** Witch now i am changing as new name **DIGVIJAY DIGAMBARRAO MORE.** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same
**Sing by : DIGVIJAY DIGAMBARRAO MORE. S/o more Digambaerrao, Sarafa line, Main Road, Kandhar, Nanded 431714 Mo.No. 9766663437**

**Change In Name**

MY OLD NAME IS KAHEKSHAN FATEMA KAHKASHA FATEMA ABDUL RAFE SHAFI. NOW I AM CHANGING AS A NEW NAME KAHEKASHA FATEMA ABDUL RAFE SHAFI. Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS. H.NO.9-6-148, UMAR COLONY DEGLOOR NAKA POST ITWARA NANDED MS 431604. MOB.NO.9623009770

**Change In Name**

My old Name is **TABASSUM BEGUM** Which now I am Changing as New Name **TABSUM BEGUM.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.
Address :- H.No. 9.8 BRAHMPURI SURVEY NO.16. MILLAT NAGAR PLOT NO 68 ITWARA NANDED. PIN 431604. MAHARASHTR. INDIA.

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**Change In Name**

My old Name is **Digambarao more** Witch now i am changing as new name **Digamber govindrao more.** Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same
**Sing by : Digamber Govindrao More S/o Govindrao More, Main Road, Kandhar, Nanded 431714 Mo.No. 9766663437**

**Change In Name**

My old name is **SHEKHAR GADEWAR.** I have now changed my name to **SHEKHAR BHARATRAO GADEWAR.** Henceforth, I shall be known as Shekhar Bharatrao Gadewar for all purposes and all my future correspondence shall be done in my new name only. Please take note of the same.
Signed by: Shekhar Bharatrao Gadewar
Current Address: Shekhar Bharatrao Gadewar, Shivaji Nagar, Opp More Hospital, Nanded, PO: Shivajinagar, District: Nanded, Maharashtra - 431602.
Permanent Address: Shekhar Bharatrao Gadewar, Shivaji Nagar, Opp More Hospital, Nanded, PO: Shivajinagar, District: Nanded, Maharashtra - 431602.

**Change In Name**

My Old Name is **MOHMED TAUFEEQUE MOHMED ISHAQUE** which now I am changing as New Name **MOHAMMED TAUFEEQUE MOHAMMED ISHAQUE** for passport issuance. Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same.
Adress: 9-6-158, UMAR COLONY, NEAR CITIZEN GYM, DEGLOOR NAKA, NANDED 431604 MAHARASHTRA Mob: 9595077163

**Change In Name**

My old Name is **MOHAMMAD ZAID KHAN** Which now I am Changing as New Name **MOHAMMAD ZAID KHAN LAYEEQUE AHMED KHAN.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address :- Ashraf Nagar, Near Hazari Hospital, Hingoli Gate, Nanded

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस व सर्व संबंधितास या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, दि टिळकनगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) असदुल्लाबाद येथील नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. 38 ज्याचा सी.टी.एस.नं. 8441 मधिल प्लॉट नं. 31/1 चे मुळ मालक महेश नामदेवराव अंबोरे, वय 42 वर्ष, रा. नांदेड हे असून यांनी प्लॉट नं. 31/1 हा विकसित करणेकरीता दस्त क्र.12318 दि.08.12.2023 अन्वये श्री महेश पुंडलिकराव देशमुख यांना दिला आहे. विकासक श्री महेश देशमुख यांनी सदरील प्लॉट नं. 31/1 वर साई पद्मजा रेसिडेन्सी या नावाने ईमारत बांधली आहे.

सदरील साई पद्मजा रेसीडेन्सी मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.302 ज्याचा कारपेट एरिया 858 चौ. फुट एवढा आहे. सदरील फ्लॅट नं.302 हा रु.45,00,000/- (अक्षरी पंचेचाळीस लक्ष रु.फक्त) एवढया किंमतीस श्री महेश नामदेवराव अंबोरे यांनी दि.17.07.2026 रोजीच्या विक्री करारनाम्याव्दारे श्री बापुराव अरविंदराव वानखेडे, वय 41 वर्ष रा. ल्याहरी ता.हदगाव यांना कायमचा विक्री केलेला आहे. तसेच ईसारापोटी श्री बापुराव अरविंद वानखेडे यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, हदगाव च्या शाखेचा धनादेश क्र.386963 दि.16.07.2026 अन्वये रु.9,00,000/- (अक्षरी रुपये नउ लक्ष फक्त) एवढी रक्कम श्री महेश नामदेवराव अंबोरे यांना दिली आहे. तसेच उर्वरीत रक्कम रजिस्ट्रीच्या दिवशी घेण्याचे ठरले आहे. सदरील फ्लॅट नं.302 ची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्व-फ्लॅट नं.301 व पायऱ्या, पश्चिम-मार्जीनल मोकळी जागा, दक्षिण-मार्जीनल मोकळी जागा, उत्तर-मार्जीनल मोकळी जागा आहे.

उपरोक्त वर्णनाचा व चर्तु:सिमेआतील फ्लॅट नं.302 च्या फ्लॅटच्या खरेदी/विक्री व्यवहाराविषयी कोणास कोणताही आक्षेप/ऊजर, मालकी हक्क, देवाण-घेवाण, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा ई. चा बोजा असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह आक्षेप उजर हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाचे आत संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही.

त्यानंतर कोणाचाही कोणताही आक्षेप न आल्यास सदरील साई पद्मजा रेसीडेन्सीतील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.302 हा श्री महेश नामदेवराव अंबोरे यांचे नांवावरुन श्री बापुराव अरविंदराव वानखेडे यांचे नावावर हस्तांतर करण्यात येईल.

कृपया संबंधितांनी याची नोंद घ्यावी. म्हणून हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करीत आहोत.

ठिकाण: नांदेड
दिनांक : 19.08.2026

अध्यक्ष,
दि टिळकनगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.)
नांदेड

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




### एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनात धाडी

## सार्वजनिक ठिकाणी खंजिर-पिस्तूल घेऊन फिरणाऱ्यांवर कारवाई, चार जणांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान भाग्यनगर, अर्धापूर आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत कारवाई करण्यात आली. या कारवाईत अवैध लोखंडी खंजिरे आणि बनावट पिस्तूल जप्त करण्यात आले असून, संबंधित आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यानुसार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**भाग्यनगर गु.र.नं. ४४५/२०२६ – पाली नगर, नांदेड**

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी भाग्यनगर गुन्हे शोध पथकाला माहिती मिळाली की, दोन युवक पाली नगर येथील संबोधी बुद्ध विहाराजवळील पिंपळाच्या झाडाजवळ हातात खंजर घेऊन संशयास्पदरीत्या फिरत आहेत. तत्काळ कारवाई करून विशाल सिद्धार्थ गायकवाड, वय २२, रा. बेलानगर आणि अक्षय केशव पांढरे, वय २१, रा. पालीनगर यांना ताब्यात घेण्यात आले. अंगझडतीत आरोपी क्रमांक १ कडे ४२ से.मी. लांबीचा धारदार लोखंडी खंजर आढळून आला. तो जप्त करून दोघांविरुद्ध कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

**भाग्यनगर गु.र.नं. ४४६/२०२६ – झेंडा चौक, नांदेड**

त्याच दिवशी झेंडा चौक ते शिवाजी चौक रोडवर एक युवक अवैध खंजर बाळगून फिरत असल्याची माहिती मिळाली. पंचांसमक्ष छाप्यात शुभम सदाशिवराव शिराडणकर, वय २५, रा. शंकरनगर, तरोडा (खु.) याच्याकडे ३३ से.मी. लांबीचा लोखंडी खंजर मिळून आला. अंदाजे किंमत ५०० रुपये असलेला खंजर जप्त करून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

**अर्धापूर गु.र.नं. ४६२/२०२६ – बनावट पिस्तूल**

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी अर्धापूर बसस्थानकासमोर एक इसम बनावट पिस्तूल घेऊन दहशत निर्माण करत असल्याची माहिती मिळाली. कारवाईत श्रीराम रमेशराव मेटकर, वय ४५, रा. श्रीरामनगर, अर्धापूर याच्याकडे विनापरवाना बनावट पिस्तूल आढळले. ते जप्त करून कलम ६/२८ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.

### 'एसआयआर'ची अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार

**नांदेड (प्रतिनिधी)** – भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून राबविण्यात येणाऱ्या या प्रक्रियेत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासंबंधीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या उद्देशाने वेळापत्रकात ही सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रारूप मतदार यादीसंदर्भात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येऊ शकतील. तसेच ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींबाबत नोटीस देणे तसेच त्यांचा निपटारा करण्यात येईल.

### डीवायएसपी शिंदे यांच्या पथकाची कारवाई

## विष्णुपुरी पुलाजवळ वाळूच्या तीन टेम्पोसह १२.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई केली. इतवाराचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या पथकाने विष्णुपुरी नवीन पुलाजवळ केलेल्या या कारवाईत वाळूने भरलेले ३ टेम्पो पकडण्यात आले. वाहनांसह वाळू असा एकूण १२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

दि. १९ ऑगस्ट रोजी नांदेड ग्रामीण पोलिसांना विष्णुपुरी नवीन पुलाजवळ अवैधरित्या वाळूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार पांचाळ, गौस, सर्जितसिंघ पुरी आणि पवार यांनी पहाटे सुमारे ५ वाजता विष्णुपुरी नवीन पुलाच्या परिसरात पाहणी केली. यावेळी वाळूने भरलेली वाहने संशयास्पदरीत्या आढळून आली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ३ टेम्पो ताब्यात घेतले.

MH 06 G 9919, MH 22 VX 307, MH 04 FJ 1860 या क्रमांकाची वाहने जप्त केली आहेत. पोलिसांनी शेख आयुब शेख इस्माईल रा. सैलाबनगर, दिनकर सीताराम धोंडे रा. जुना कौठा, किरण प्रल्हाद हनमंते रा. तेहरानगर, नांदेड या चालकांना अटक केली आहे. पोलिसांनी तिन्ही टेम्पोसह वाळू जप्त करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १२ लाख १५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याकडून अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध पुढील तपास सुरू आहे.

### पैशाचे आमिष दाखवून वेश्या व्यवसाय; पोलिसांनी बोगस गिऱ्हाईक पाठवून टाकली धाड

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील अनैतिक मानवी व्यापारास आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने मोठी कारवाई केली. नाईक नगर चौकातील एका खाजगी घरात छुप्या मार्गाने चालवला जाणारा कुंटणखाना उद्ध्वस्त करून २ महिलांची सुटका करण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर वेंजने यांच्या नेतृत्वात दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी आनंदनगर ते शोभानगर रोडवरील नाईक नगर चौकातील चौहान यांच्या घरावर ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की, आरती नामक महिला ही आपले पार्टनर प्रताप गायकवाड, रा. उमरी आणि बाजीराव ताटे, रा. राजनगर यांच्यासोबत महिलांना पैशाचे आमिष दाखवून बळजबरीने वेश्या व्यवसाय करून घेत आहे.

माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी शासकीय पंचासमक्ष एका सामाजिक कार्यकर्त्याला बोगस गिऱ्हाईक म्हणून घरात पाठवले. बोगस गिऱ्हाईकाने वेश्यागमनासाठी निश्चित करताच ठरल्याप्रमाणे पोलिसांना इशारा दिला. इशारा मिळताच पोलीस पथकाने घरावर छापा टाकला. घटनास्थळी महिला आरोपी आरती विकेश सोनकांबळे, वय ३५, रा. गणेशनगर वाय पॉईंट आणि आरोपी प्रताप संभाजी गायकवाड, वय १९, रा. हतनी ता. उमरी, ह.मु. राजनगर हे मिळून आले. तर बाजीराव ताटे, रा. राजनगर हा फरार झाला.

## नांदेडमध्ये महा मंडलेश्वर श्री कनकेश्वरी देवींच्या 'गुरु महिमा सत्संगा'चे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)** – सद्गुरू सेवा समिती, नांदेडच्या वतीने शहरातील डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह येथे महा मंडलेश्वर श्री कनकेश्वरी देवी यांच्या उपस्थितीत 'गुरु महिमा सत्संग' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आध्यात्मिक सोहळा ६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे.

या सत्संगाच्या माध्यमातून नांदेड व परिसरातील भाविकांना महा मंडलेश्वर श्री कनकेश्वरी देवी यांच्या मुखातून गुरु महिमा, अध्यात्मिक विचार आणि जीवनमूल्यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या सोहळ्याबाबत भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सद्गुरू सेवा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्संग सोहळ्याचा लाभ नांदेड शहरासह परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाचा तपशील कालावधी : ६ ते १० ऑक्टोबर २०२६ वेळ : दुपारी ३ ते सायंकाळी ६ स्थळ : डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड आयोजक : सद्गुरू सेवा समिती, नांदेड संपर्क अधिक माहितीसाठी ओमप्रकाश पोकर्णा ९४२२१७२०००, प्रकाशराव देशमुख (तरोडेकर) ९८९०५१८०९३, दद्दू पुरोहित ९४२२१७२४६६ आणि जितेंद्र दायमा ९४२२१७०९९९ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

## नांदेडमध्ये मोफत योग व आरोग्य समुपदेशन केंद्राचे रविवारी उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री विश्वकर्मा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेअंतर्गत नांदेड योग सेवा समितीच्यावतीने नागरिकांसाठी मोफत आरोग्य व जीवनशैलीविषयक समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येत आहे. या केंद्राचे उद्घाटन रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते होणार आहे.

योग, आयुर्वेद, निरोगी जीवनशैली, ताणतणावमुक्त जीवन आणि मानसिक आरोग्य याबाबत नागरिकांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. योगाचार्य तथा 'नांदेड योगरत्न भूषण' सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राचे कामकाज होणार आहे. योगेश्वरा अपार्टमेंट, राज मॉलजवळ, आनंदनगर, नांदेड येथे हे केंद्र सुरू होणार आहे.

सोनटक्के गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून योगाचा प्रचार-प्रसार सुरू असून, नांदेड योग समितीच्या माध्यमातून शहरात १२ ते १५ योग शाखा कार्यरत आहेत. 'हर घर योग' या संकल्पनेतून हजारो नागरिकांना मोफत योगसेवा दिली जात आहे. याच कार्याचा विस्तार म्हणून समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यपूर्ण आणि आनंदी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

उद्घाटन समारंभास राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, दैनिक गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, दैनिक लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी श्रीनिवास भोसले, प्रजावाणीचे पत्रकार शरद काटकर, पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी कालिदास जहागीरदार, दैनिक गोदातीर समाचारचे जिल्हा प्रतिनिधी प्रल्हाद कांबळे, वरिष्ठ पत्रकार दादाराव आगलावे, गिरीश कहाळेकर, प्रल्हाद आयनेले, वरिष्ठ पत्रकार संतोष कुलकर्णी, हर्षद शहा यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

दरम्यान, योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी यांनी नांदेड योग समितीच्या शिष्टमंडळासह कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांची भेट घेऊन त्यांना उद्घाटनाचे निमंत्रण दिले. डॉ. चासकर यांनी निमंत्रण स्वीकारले. यावेळी स्वारातीम विद्यापीठाचे सहायक कुलसचिव तुकाराम भुरके, योग शिक्षक महेश सोमणवार, निवृत्त बँक अधिकारी व योगसाधक लक्ष्मीकांत फुके आणि मीडिया प्रमुख मकरंद पांगरकर उपस्थित होते.

## ओजेटी व फील्ड प्रोजेक्ट विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी : डॉ. प्रशांत पेशकार



**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी Effective Implementation of On-the-Job Training (OJT) and Field Project for B.Sc. Third Year under NEP-2020 तसेच हिंदी विभागाच्या वतीने राष्ट्रीय शिक्षा नीती (NEP-2020) के अंतर्गत बी.ए. तृतीय वर्ष के लिए तैयार किए गए पाठ्यक्रम के कार्यान्वयन या दोन विषयांवर प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन प्रतिभा निकेतन महाविद्यालयात करण्यात आले. या संयुक्त कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार यांच्या हस्ते झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना उद्घाटक डॉ. प्रशांत पेशकार यांनी OJT व फील्ड प्रोजेक्ट ही विद्यार्थ्यांसाठी एक प्रकारची सुवर्णसंधी आहे, असे प्रतिपादन केले. पारंपरिक शिक्षणपद्धतीला पूरक ठरणाऱ्या नवनवीन तंत्रांचा व कार्यपद्धतींचा स्वीकार करून प्रत्येकाने बदलत्या काळानुसार स्वतःला अद्ययावत करणे आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

केवळ वर्गातील सैद्धांतिक ज्ञान न घेता प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील अनुभव हा विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासोबतच त्यांच्या रोजगार क्षमतेसाठीही महत्त्वाचा ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर होते. यावेळी प्रसिद्ध उद्योजक तथा बीजभाषक डॉ. सुबोध व्ही. कुळकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, हिंदी अध्ययन मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुजीतसिंह परिहार, उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी, डॉ. एम. बी. लुटे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या विविध सत्रांमध्ये OJT व फील्ड प्रोजेक्टचे महत्त्व, उद्योगांशी जोडणी, इंटर्नशिपच्या संधी, सामंजस्य करार (MoU), फील्ड प्रोजेक्टचे मूल्यमापन, Viva-Voce, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, उद्योगांच्या अपेक्षा, रोजगारक्षमता कौशल्ये, इंटर्नशिपच्या संधी, जगढचे मूल्यांकन आणि अहवाल लेखन या विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. सुबोध कुळकर्णी, श्री. पी.एस.एन.मूर्ती, डॉ. मिर्झा मुश्ताक वसीम बेग, प्रा. डॉ.प्रकाश जाधव यांच्यासह अनेकांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

## स्वारातीम विद्यापीठाला महत्त्वपूर्ण भारतीय पेटंट

### क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या नॅनो-ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला पेटंटची मान्यता



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुलाच्या संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे. क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या प्रभावी वितरणासाठी विकसित करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे.

Nanostructured Delivery Device for Poorly Water-Soluble nti-Tubercular Drugs and Method Thereof या नावाने असलेल्या संशोधनास पेटंट मंजूर झाले असून, पेटंटचा कालावधी २० वर्षांचा आहे. या संशोधनाचे पेटंटधारक व संशोधक म्हणून डॉ. सुरेंद्र जी. गट्टानी, स्वप्नील पाटील आणि प्रदीप निरभवणे यांची नोंद आहे.

कमी पाण्यात विरघळणाऱ्या क्षयरोगविरोधी औषधांच्या शरीरातील औषध-वितरण प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्यासाठी नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग-डिलिव्हरी पद्धतीचा या संशोधनात वापर करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे औषधांची प्रभावीपणे शरीरात पोहोच वाढविण्यास तसेच त्यांच्या उपचारात्मक परिणामकारकतेत सुधारणा करण्यास संभाव्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आधुनिक औषध-वितरण प्रणालीच्या क्षेत्रात हे संशोधन महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर आणि औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार यांनी डॉ. सुरेंद्र गट्टानी व त्यांच्या सहसंशोधकांचे अभिनंदन केले. त्यांच्या संशोधनातून औषधनिर्माणशास्त्र, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा निर्मितीच्या क्षेत्राला चालना मिळणार असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या पेटंटमुळे औषधनिर्माणशास्त्र संकुलाची संशोधनातील उत्कृष्टता, नवोपक्रम, बौद्धिक संपदा निर्मिती आणि आधुनिक औषध-वितरण तंत्रज्ञानाच्या विकासाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली आहे. तसेच या यशामुळे विद्यापीठातील शिक्षक व संशोधकांना आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांवर नाविन्यपूर्ण व उपयोजित संशोधन करण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. विद्यापीठाच्या संशोधन परंपरेत भर घालणारे हे पेटंट म्हणजे नांदेडच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासाठी अभिमानाची बाब असून, औषधनिर्माणशास्त्रातील विद्यापीठाच्या वाढत्या संशोधन क्षमतेचे हे द्योतक मानले जात आहे.

## नांदेडच्या साहित्यिक परंपरेला मान; अशोकनगर पाण्याच्या टाकी चौकाचे ग्रंथ चौक नामकरण करण्याची मागणी




**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील अशोकनगर येथील पाण्याच्या टाकी जवळील चौकाचे ग्रंथ चौक असे नामकरण करावे, अशी मागणी शहरातील लेखक, कवी, संपादक आणि वाचकांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यासोबतच या चौकात पुस्तकाचे भव्य म्युरल बसविण्यात यावे, अशीही विनंती महापालिकेच्या महापौर कविता मुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शहरातील साहित्यिकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर चौकात 'कृष्णाई' हे प्रसिद्ध ग्रंथालय आहे. तसेच येथे महानगरपालिकेचे एक सार्वजनिक ग्रंथालय देखील कार्यरत आहे. या परिसराला थोर विचारवंत, साहित्यिक कै. नरहर कुरुंदकर यांच्या ग्रंथरूपी योगदानाचा वारसाही लाभला आहे.

हाच परिसर साहित्यिकांचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. येथे लक्ष्मीकांत तांबोळी, भु. द. वाडीकर, सुधाकर डोईफोडे, दत्ता भगत, स. दि. महाजन, जगदीश कदम, भगवंत क्षीरसागर, रवींद्र तांबोळी, एल. के. कुलकर्णी, दत्ता डांगे, अल्का कुलकर्णी आदी अनेक नामवंत साहित्यिकांचे वास्तव्य आहे.

याचबरोबर या चौकातील निर्मल प्रकाशनाने ८०० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. तर जवळच असलेल्या इसाप प्रकाशनाने ६०० हून अधिक ग्रंथनिर्मिती केली आहे. त्यामुळे हा परिसर केवळ निवासी नसून, तो नांदेडच्या साहित्य आणि प्रकाशन क्षेत्राचा केंद्रबिंदू बनला आहे. नांदेड शहराला समृद्ध लेखन परंपरा लाभली आहे. या पार्श्वभूमीवर कै. नरहर कुरुंदकर मार्गावरील पाण्याच्या टाकीजवळील चौकास ग्रंथ चौक असे नाव द्यावे, अशी मागणी साहित्यिकांनी केली आहे. तसेच या चौकाचे सुशोभीकरण करून तेथे पुस्तकाचे आकर्षक म्युरल बसवावे, जेणेकरून नांदेडची साहित्यिक ओळख अधिक अधोरेखित होईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

### प्रयागबाई तिडके यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील देगाव बु. येथील ज्येष्ठ महिला प्रयागबाई भुजंगराव तिडके (८२) यांचे बुधवार, दि.१९ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि.२० रोजी दुपारी १२ वा. देगाव बु.(कारखाना) ता. अर्धापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

प्रयागबाई तिडके यांच्या पश्चात १ मुलगा, ८ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रगतशील शेतकरी माधव भुजंगराव तिडके यांच्या मातोश्री होत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com